cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३४ | मंगळवार, दि.०९ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महागाई घटेल, दिशा मिळेल!

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) १ जुलै २०17 पासून लागू होऊन भारताच्या करप्रणालीत आमूलाग्र बदल घडवला. यंदा २२ सप्टेंबरपासून लागू होणारा आणि जीएसटी परिषदेने जाहीर केलेल्या कर कपातीमुळे वाहने, जीवनावश्यक वस्तू आणि नवीकरणीय ऊर्जा उपकरणे स्वस्त होणार आहेत. या सुधारणांनी महागाईवर मर्यादा येण्याची अपेक्षा आहे. गेल्या सात, आठ वर्षात लोक कर भरून वैतागले. सर्वसामान्य जनता, शेतकरी, उद्योजक, व्यापारी सर्वजण हैराण होते. मात्र त्या विरोधात पुरेसा आवाज उठत नव्हता. त्याचे फटके मात्र बसत होते.

### सोशल मिडियावर बंदी नेपाळमध्ये आंदोलन

काठमांडू : नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदीविरोधात तरुण–तरुणींनी जोरदार आंदोलन छेडले असून आतापर्यंत २० जणांचा बळी गेला आहे तर २०० पेक्षा अधिक नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. काठमांडूसह अनेक शहरांत हजारो आंदोलनकारी रस्त्यावर उतरले. संसद भवनात घुसून तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी अश्रुधूर, पाणी फवारणी केली तर गोळीबारात अनेक जखमी झाले. या आंदोलनात मृतांचा आकडा २० वर गेला असून, शंभरहून अधिक लोक जखमी झाले आहेत. काठमांडूमध्ये कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. पोखरा, इटहरीतही हिंसक घटना घडल्या असून गंडकी प्रदेशातील मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयावर दगडफेक झाली. तरुणाईच्या या 'जेन जे– क्रांती'मुळे नेपाळमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोशल मीडियावरील बंदी विरोधात नाराज युवा वर्ग रस्त्यावर उतरला आहे.

# १७ सप्टेंबरपासून संयुक्त किसान मोर्चा विदर्भ दौऱ्यावर

## शेतकऱ्यांशी साधाणार संवाद, डॉ. अशोक ढवळे, राकेश टिकैत यांच्यासह राजू शेट्टी, बच्चू कडू यांचा समावेश

पुणे । प्रतिनिध

**विदर्भातील वाढत्या शेतकरी आत्महत्या, केंद्र सरकारचे कापूस धोरण, आयात–निर्यातावरील अन्यायकारक टॅरिफ आणि कृषी संकटाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त किसान मोर्चाचे राष्ट्रीय नेते १७ सप्टेंबरपासून तीन दिवसीय विदर्भ दौऱ्यावर येत आहेत. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांशी प्रत्यक्ष संवाद, कापूस उत्पादकांची व्यथा जाणून घेणं आणि आगामी लढ्याची दिशा ठरवणं, यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आल्याचे संयुक्त किसान मोर्चाने सांगितले आहे.**




या दौऱ्यात देशभरातील ख्यातनाम शेतकरी नेते सहभागी होणार आहेत. दिल्लीतील ऐतिहासिक शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व करणारे डॉ. अशोक ढवळे, विजू कृष्णन, राकेश टिकैत, युधवीर सिंग, पी. कृष्णप्रसाद, तजिंदर सिंग विर्क यांच्यासह राजू शेट्टी, बच्चू कडू, विजय जावंधिया यांसारखे नेते देखील हजर राहणार आहेत. देशभरात शेतकरी आत्महत्या करणाऱ्या राज्यांच्या यादीत महाराष्ट्र अव्वल असून त्यातही विदर्भ हे आत्महत्यांचे केंद्र बनले आहे. वाढत्या कर्जबाजारीपणामुळे असहाय झालेला शेतकरी थेट आत्महत्येचा पर्याय स्वीकारत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संयुक्त किसान मोर्चा मैदानात उतरणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे. तसेच केंद्र सरकारने अलीकडेच कापूस आयातीवरील ११% शुल्क आणि कृषी पायाभूत सुविधा उपकर रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्याचवेळी, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या कापड निर्यातीवर ५०% टॅरिफ लावले आहे. त्यामुळे कापसाच्या किंमतीवर दबाव वाढण्याची शक्यता असून या दोन्ही धोरणांचा एकत्रित परिणाम शेतकऱ्यांवर होणार आहे. त्यामुळे आत्महत्यांचा आकडा वाढण्याची भीती शेतकरी संघटनांनी पत्रकात व्यक्त केली आहे. दरम्यान, सरकारने आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत केली नाही आणि कापसाच्या आयात–निर्यात धोरणात बदल केला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन तीव्र केले जाईल. या दौऱ्याचा उद्देश संवेदनशील संवादातून संघर्षाची दिशा ठरवणे असा असून विदर्भातील परिस्थितीवर राष्ट्रीय लक्ष वेधण्याचा प्रयत्न मोर्चा करण्यात येणार असल्याचे संयुक्त किसान मोर्चाने सांगितले आहे.

## थोडक्यात...

### एसटीतून आरक्षण देण्याची बंजारा समाजाची मागणी

मुंबई : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय (जीआर) काढला आहे. यामुळे मराठा समाजातील कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आता बंजारा समाजानेही हैदराबाद गॅझेटच्या आधारावर अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. सध्या विमुक्त व भटक्या जमाती (व्हीजेएनटी–ए) प्रवर्गात असलेल्या बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी जोर धरत आहे. या मागणीसाठी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांनी मंगळवारी (८ सप्टेंबर) मुंबईत एका उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले होते.

### ८८ देशांनी दाखविला ट्रम्प यांना हिसका

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील देशांवर कर लादून खळबळ उडवून दिली होती. भारतावरही ५० टक्के कर लादण्यात आला होता. मात्र अमेरिकेच्या या टॅरिफचा सर्वात मोठा फटका अमेरिकेला जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय टपाल सेवांना बसला आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनने दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेला जाणारी टपाल वाहतूक ८० टक्क्यांहून अधिक कमी झाली आहे. त्यामुळे याचा परिणाम अमेरिकन नागरिकांवर होताना दिसत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, जगभरातील ८८ देशांमधील टपाल ऑपरेटर्सनी आपल्या सेवा काही काळासाठी किंवा कायमच्या स्थगित केल्या आहेत. सुरुवातील अमेरिकेने लहान वस्तूंवर सूट दिली होती. मात्र २९ ऑगस्टपासून सर्व टपाल सेवांवर कर लावण्याची घोषणा केली होती. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय टपाल सेवा विस्कळीत झाली आहे.

### आधार कार्ड ग्राह्य धरा – सर्वोच्च न्यायालय

दिल्लीः बिहारमध्ये निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हीजन अर्थात एसआयआर बाबत सर्वोच्च न्यायलयातून मोठी अपडेट येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच निवडणूक आयोगाला बिहारमधील एसआयआरसाठी १२ वा दस्तऐवज म्हणून आधार कार्डचा समावेश करण्यास सांगितले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने आधार कार्ड हे फक्त एक ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरण्यास सांगितले आहे. आधार कार्ड हा नागरिकत्वाचा पुरावा नाही, असे देखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या जस्टीस सूर्यकांत आणि जस्टीस जोयमाला बागची या दोन न्यायाधीशांच्या बेंचने दिला आहे.

### मेहुल चोक्सीला तुरुंगात स्वच्छ पाणी, टॉयलेट देणार

नवी दिल्लीः केंद्रीय गृह मंत्रालयाने बेल्जियम सरकारला एका पत्राद्वारे मेहुल चोक्सीला ताब्यात घेण्यासाठी औपचारिक आश्वासने दिली आहेत. जर चोक्सीला भारतात आणले तर त्याला अमानुष वागणूक दिली जाणार नाही. त्याशिवाय त्याला मेडिकलसह १४ सुविधा पुरवल्या जातील असे भारताने बेल्जियमला सांगितले आहे. गृह मंत्रालयाने सांगितले आहे की, मेहुल चोक्सीला मुंबईच्या आर्थर रोड जेलमधील बॅरेक नंबर १२ मध्ये ठेवले जाईल. या कोठडीत ६ लोकांच्या राहण्याची क्षमता आहे. पत्र पाठवेपर्यंत बॅरेकमधील कोठडी रिकामी करण्यात आली होती. पळपुटा उद्योगपती मेहुल चोक्सीवर पंजाब नॅशनल बँकेत १३ हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली. भारतीय तपास यंत्रणेच्या प्रत्यार्पणाच्या आवाहनावर १२ एप्रिलला चोक्सीला अटक झाली.



# एका समाजाला न्याय मग आमच्यावर का अन्याय?

## १५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयात धडकणार बंजार समाजाचा मोर्चा

बीड । प्रतिनिधी

**आरक्षणाची धग पेटली असून जिल्ह्यातील बंजारा बांधवाकडून जिल्हास्तरीय व्यापक बैठक घेत १५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा धकणार असल्याचे म्हटले आहे. यामध्ये जिल्ह्यातील लाखो बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याचे निर्णय घेण्यात आला आहे.**

आता लेकरांच्या भविष्यासाठी लढाई सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनाने मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट लागू करत आरक्षण देण्याचे काम केले मात्र त्या गॅझेटमध्ये बंजारा समाजाची एसटी प्रवर्ग म्हणून नोंद असून इतर राज्यात बंजारा बांधवांना एसटी प्रवर्गाचा लाभ दिला जातो मग महाराष्ट्र

▶▶ पान २ वर

# १७ सप्टेंबरच्या आत कुणबी प्रमाणपत्र द्या !

## मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला इशारा, नारायण गडावरील दसरा मेळाव्यात घेणार भुमिका

जालना । प्रतिनिध

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाड्यातील मराठ्यांना हैद्राबाद गॅझेटियरनुसार १७ सप्टेंबरपर्यंत कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी करत सरकारला कडक इशारा दिला आहे. प्रमाणपत्राची कार्यवाही झाली नाही तर नारायणगडावरील दसरा मेळाव्यात सरकारविरोधात मोठी भूमिका घेणार असल्याचे ते म्हणाले.

मंगळवारी पत्रकारांशी बोलताना जरांगे यांनी जीआर मजबूत

▶▶ पान २ वर



# उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान; विरोधकांची जोरदार तयारी

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारताच्या १७ व्या उपराष्ट्रपतीपदासाठी आज मंगळवारी (९ सप्टेंबर) मतदान होणार आहे. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)



आणि विरोधी 'इंडिया' आघाडी यांच्यात चुरशीची लढत होत आहे. दरम्यान, सोमवारी दोन्ही गटांनी मतदानाची रंगीत तालीम आयोजित केली होती. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव दिलेल्या राजीनाम्यामुळे हे पद रिक्त झाले असून, या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले आहे.

एनडीएचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन (तमिळनाडू) आणि इंडिया आघाडीचे उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी (तेलंगणा) यांच्यात थेट स्पर्धा आहे. दोन्ही उमेदवार दक्षिण भारतातील असल्याने ही निवडणूक राजकीय आणि वैचारिक लढाईसह 'दक्षिण विरुद्ध दक्षिण' अशी रंगत आहे. राधाकृष्णन हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपशी दीर्घकाळ निगडित असलेले निष्ठावान नेते मानले

▶▶ पान २ वर


# उमाजी नाईक महामंडळाकडून २ लाखांपर्यंत बिगर तारण कर्ज

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

**रामोशी–बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला. राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून २ लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक व व्यावसायिक घडावेत, यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.**

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक



यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. इंग्रजांविरुद्ध पहिली ठिणगी पेटवणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे ख–या अर्थाने क्रांतिकारक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या

▶▶ पान २ वर

# काँग्रेसचा विधान परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी दावा

## सतेज पाटील यांचे नाव आघाडीवर, उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर घडामोडींना वेग

मुंबई । प्रतिनिधी

**विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसकडून माजी मंत्री सतेज पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. यासाठी काँग्रेस नेत्यांनी मंगळवारी (दि.८) दुपारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर जाऊन भेट घेतली. यावेळी ठाकरे यांच्याकडे विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसला पाठिंबा देण्याची मागणी करण्यात आली.**

काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात आणि पक्षाचे उपनेते अमीन पटेल यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदासाठी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, अशी अधिकृत मागणी करण्यात आली.



दरम्यान, शिवसेना नेते अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे हे पद आता काँग्रेसकडे जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, काँग्रेसकडून माजी मंत्री सतेज पाटील यांच्या नावावर जवळपास एकमत झाले असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, या घडामोडींमुळे विधान परिषदेत विरोधी पक्षाची आघाडी कशी राहील, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# बोगस शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी फास आवळला

## परळी, माजलगाव, अंबाजोगाईसाठी समिती गठीत!

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील खाजगी शाळा मधील शिक्षक भरती घोटाळा चांगलाच गाजला असून याच्या चौकशीसाठी शिक्षण उपसंचालकाच्या अध्यक्षतेखाली एस आय टी स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील आठ शाळांच्या तपासणीसाठी परळी अंबाजोगाई माजलगाव या तीन तालुक्यासाठी माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी समिती नेमली आहे.**

जिल्ह्यात खाजगी शाळेत बोगसपणे केलेली शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची भरती,शालार्थ आयडी यासह अन्य गोष्टी सरकार दरबारी उघडकीस आलेल्या आहेत. यासदर्भात मूळ तक्रारदार भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्षसादेक इनामदार



यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच एसआयटीकडे लेखी तक्रार केलेली आहे. त्यांच्या याच तक्रारीची दखल घेवून एसआयटीचे सदस्य सचिव तथा पुण्याच्या शिक्षण सहसंचालकांनी बीड जिल्ह्यातील शाळांची तपासणी करण्याचे आदेश छ. संभाजीनगरच्या शिक्षण उप संचालकांना दिलेले आहेत. पुढे या पत्रानुसार तात्काळ कारवाई करावी, अशा सुचना यावेळी शिक्षण उपसंचालकांनी बीडच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांना दिल्या आहेत. त्यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनीही आपल्या अध्यक्षतेखाली तात्काळ यासंदर्भात एक चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीमध्ये सचिव म्हणून माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी विपूल भागवत तर सदस्य म्हणून प्रभारी उपशिक्षणाधिकारी एन. जे. हजारे, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाचे अधीक्षक राजेश खटावकर आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे अधीक्षक अजय बहीर यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार परळी येथील वैद्यनाथ विद्यालय,

▶▶ पान २ वर

# राजकीय लढाईसाठी न्यायालयाचा वापर करू नका–सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृतसंस्था

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्याविरोधातील प्रदेश भाजपची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. राजकीय लढाईसाठी न्यायालयाचा वापर करु नका, अशी टिप्पणी यावेळी सरन्यायाधीश बी.आर. गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने केली.

२०२४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पक्षाविरोधात बदनामी करणारे वक्तव्य

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५०.५० क्विंटल | २,३०० | २,९३६ | २,६४४ |
| ज्वारी/हायब्रिड :१९५.०० क्विंटल | १,९०० | ३,३०० | २,३९३ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २०.०० क्विंटल | ५,४०० | ६,१०१ | ५,८५० |
| उडीद :१५७.००क्विंटल | ३,३०० | ६,५५१ | ५,०४६ |
| बाजरी: १४१.०० क्विंटल | १,९०० | २,९५१ | २,५२५ |
| मुग: ५२.५० क्विंटल | ३,५०१ | ७,७०० | ५,५८९ |
| सोयाबीन: ९.५० क्विंटल | ३,७०० | ४,३५० | ४,०२५ |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ५,००० | ६,९५१ | ५,९६२ |

cmyk

cmyk



## अग्रलेख

# महागाई घटेल, दिशा मिळेल!

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) १ जुलै २०१७ पासून लागू होऊन भारताच्या करप्रणालीत आमूलाग्र बदल घडवला. यंदा २२ सप्टेंबरपासून लागू होणारा आणि जीएसटी परिषदेने जाहीर केलेल्या कर कपातीमुळे वाहने, जीवनावश्यक वस्तू आणि नवीकरणीय ऊर्जा उपकरणे स्वस्त होणार आहेत. या सुधारणांनी महागाईवर मर्यादा येण्याची अपेक्षा आहे. गेल्या सात, आठ वर्षात लोक कर भरून वैतागले. सर्वसामान्य जनता, शेतकरी, उद्योजक, व्यापारी सर्वजण हैराण होते. मात्र त्या विरोधात पुरेसा आवाज उठत नव्हता. त्याचे फटके मात्र बसत होते. विरोधकांनी विशेषत: राहुल गांधी यांनी 'गब्बर सिंग टॅक्स' अशी टीका केली तरी बदल झाला नव्हता मात्र लोकांत त्या बाबतचा रोष वाढत होता. या असंतोषाची दखल घेत सरकारला आठ वर्षांनंतर का होईना सुधारणांचा मार्ग स्वीकारावा लागला.

जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत (३-४ सप्टेंबर २०२५) स्लॅब्स ० टक्के, ५ टक्के, १२ टक्के, २८ टक्के वरून प्रामुख्याने ५ टक्के आणि १८ टक्केमध्ये समाविष्ट झाले. जीवनावश्यक वस्तूंवरील (उदा., पनीर, दही, औषधे) जीएसटी १२ टक्के वरून ५ टक्के किंवा ० टक्के झाला, तर वाहनांवरील (लहान कार, हायब्रिड) कर २८ टक्के वरून १८ टक्के झाला. यामुळे दैनंदिन वस्तू आणि वाहनांच्या किमतीत १०-१५ टक्के कपात अपेक्षित आहे, ज्यामुळे ग्राहकांचे खरेदी सामर्थ्य वाढेल. सणासुदीच्या काळात मागणी वाढून उत्पादन आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल. आरोग्य आणि जीवन विम्यावरील जीएसटी हटवल्याने विमा प्रीमियम स्वस्त होईल, ज्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांना दिलासा मिळेल. दीर्घकालीन दृष्टिकोनातून, ही कपात महागाईवर अंकुश ठेवेल. २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यापासून, नऊ स्लॅब्स (० टक्के ते २८ टक्के) आणि जटील प्रक्रियेमुळे 'एक देश, एक कर' ही संकल्पना अपूर्ण राहिली.

शेतकऱ्यांवर १२-२८ टक्के कर लादल्याने आणि लघुउद्योग, व्यापाऱ्यांना अनुपालनाचा त्रास झाल्याने सामान्य जनतेत नाराजी निर्माण झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जीएसटीला 'गब्बर सिंग टॅक्स' संबोधताना मध्यमवर्ग आणि शेतकऱ्यांवरील बोजा अधोरेखित केला. २०१९ आणि २०२४ च्या जाहीरनाम्यात काँग्रेसने जीएसटी २.० ची मागणी केली, ज्यामुळे केंद्राला २०२५ मध्ये सुधारणा कराव्या लागल्या. माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी या सुधारणांना ''आठ वर्षे उशिरा'' असे संबोधले, परंतु स्वागत केले. याचा परिणाम काय होईल तर ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रांना चालना मिळेल. लहान कार (उदा. मारुती स्विफ्ट, टाटा टियागो) आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या किमती कमी होऊन मागणी वाढेल, ज्यामुळे उत्पादन आणि रोजगार वाढतील. सौर मॉड्यूल्सच्या देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे 'मेक इन इंडिया'ला बळ मिळेल. ३५० सीसी पेक्षा जास्त मोटरसायकलवर ४० टक्के करामुळे लक्झरी वाहनांचा वापर कमी होईल, परंतु यामुळे काही उद्योगांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. नवीकरणीय ऊर्जा उपकरणांवरील (सौर पॅनेल, पवनचक्की, बायोगॅस) जीएसटी १२ टक्के वरून ५ टक्के झाला, तर इलेक्ट्रिक वाहनांवरील ५ टक्के कर कायम आहे. यामुळे सौर आणि पवन उर्जेचा प्रति युनिट खर्च कमी होईल, ज्यामुळे भारताच्या २०३० साठी ५०० गिगा वॅट गैर-जीवाश्म इंधन आणि २०७० च्या नेट-झीरो उद्दिष्टांना गती मिळेल. कोळशावरील जीएसटी ५ टक्के वरून १८ टक्के झाल्याने कोळसा आधारित वीज निर्मिती महागेल, ज्यामुळे नवीकरणीय उर्जेला प्रोत्साहन मिळेल. सायकलवरील कर १२ टक्के वरून ५ टक्के झाल्याने शहरी भागात सायकलिंग वाढेल, तर जैविक खतांवरील कमी कर शाश्वत शेतीला चालना देईल. मात्र, प्लास्टिक पॅकेजिंगवरील कमी करामुळे कचरा वाढण्याची शक्यता आहे, ज्यासाठी स्वतंत्र धोरणे आवश्यक आहेत. तरीही केंद्र सरकारच्या या निर्णयाने जनतेत सकारात्मक संदेश गेला. मात्र, मागील आठ वर्षांतील जटील धोरणांमुळे महागाई आणि बेरोजगारी वाढली, ज्याची जबाबदारी सरकारवर आहे. विरोधकांनी पंतप्रधानांच्या 'सबका साथ, सबका विकास' या दाव्यावर टीका केली, कारण जीएसटीच्या सुरुवातीच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना त्रास झाला. आता २०२५ च्या सुधारणांनी ही चूक दुरुस्त करण्याची संधी आहे, त्यासाठी यशस्वी अंमलबजावणी आणि पारदर्शकता आवश्यक आहे. जीएसटी कपातीमुळे राज्यांना ४८,००० कोटी रुपयांचे महसूल नुकसान अपेक्षित आहे, ज्याची भरपाई केंद्राला करावी लागेल. यामुळे हरित पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण योजनांसाठी निधी कमी पडू शकतो. तसेच, कच्च्या तेलाच्या किमती, पुरवठा साखळीतील अडथळे आणि आयात अवलंबन यामुळे महागाई नियंत्रणात अडचणी येऊ शकतात. आठ वर्षांच्या त्रुटींनंतर, २०२५ च्या जीएसटी सुधारणा ही भारतासाठी नवी सुरुवात आहे. महागाईवर अंकुश, उद्योगांना चालना आणि पर्यावरणीय शाश्वतता यांचा समन्वय साधण्याची संधी आहे. केंद्राने विरोधी पक्षांचा दबाव आणि जनतेच्या तक्रारी स्वीकारून सुलभ करप्रणाली आणली, ज्याचे स्वागत करावे लागेल. मात्र, यशस्वी अंमलबजावणी, राज्यांना नुकसानभरपाई आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन यावरच ही सुधारणा यशस्वी होईल. जीएसटी २.० यशस्वी व्हावी आणि महागाई व त्यातून निर्माण झालेले विविध प्रश्न मार्गी लागावेत हीच अपेक्षा.

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मुळ कागदपत्र दाखल करण्याचे आवाहन

**बीड । पतिनिधी**

नगरपरिषद बीड अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी) अंतर्गत युनिफाईड पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरणे सुरू असून बीड शहरातील पात्र नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाच्या युनिफाईड पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आव्हान करण्यात आले होते त्या अनुषंगाने ज्या नागरिकांनि युनिफाईड पोर्टलवर नोंदणी केली आहे त्यांनी आपले मूळ कागदपत्र १५ दिवसाच्या आत नगरपालिका कार्यालय मध्ये जमा करावी असे आव्हान मुख्य अधिकारी च्या वतीने करण्यात आली आहे.

दाखल करावयाची कागदपत्रे खालील प्रमाण आहे १) मालकी हक्काचा पुरावा जसे खरेदी खत,७/१२, पी आर कार्ड २) सर्व कुटुंब सदस्यांचे आधार कार्ड ३) अर्जदाराने मागील वीस वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजना लाभ घेतला नसल्याचे प्रतिज्ञापत्र ४) वार्षिक उत्पन्नाचा दाखला ५) आधार लिंक असलेले बँक खाते ६) सहन जागे सहित फोटो ७) पी टी आर इत्यादी वरील प्रमाणे कागदपत्र नगरपरिषद येथील प्रधानमंत्री आवास योजना या कार्यालयात लवकरात लवकर जमा करावी विहित कागद पडताळणी केली जाणार आहे त्या नंतर पात्र असलेल्याना मंजूरी देण्यात येऊन पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल ऑनलाइन केलेल्या नागरिकांनी अजून ही विहित नमुन्यात कागदपत्रे सादर केलेली नाहीत अशा नागरिकांनी १५ दिवसाच्या आत प्रधानमंत्री आवास योजना कक्ष नगरपालिका बीड येथे जमा करावी असे आव्हान मा. प्रशासक व मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी केले आहे.

## पत्रकार संघाचा पुरस्कार शरद शेजाळ यांना जाहीर

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सी.बी.एस.ई ची नामांकित ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल ,सोमेश्वर नगर ,बार्शी रोड, बीड या शाळेचे मराठी विषय शिक्षक शरद नारायण शेजाळ यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा सर्वोच्च पुरस्कार या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीमुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. या अगोदर विर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार, महाराष्ट्र योद्धा पुरस्कार ,राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शरद नारायण शेजाळ हे सिरसमार्ग ता. गेवराई, जि. बीड चे भूमिपुत्र आहेत. त्यांचे सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनिय आहे. त्यांच्या कार्याशी एकनिष्ठ होऊन जबाबदारीने काम पार पाडतात. कर्तव्यदक्ष ,गुणवान ,प्रतिभावंत कार्यक्षम व्यक्तिमत्व असणारे शरद शेजाळ यांचे शिक्षण एम.ए , एम.एड आहे. ते मराठी विषयाचे उत्कृष्ट अध्यापनाचे कार्य करतात. या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.पुरस्कार जाहीर झाल्या नंतर शरद शेजाळ यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. संतोष मानूरकर, तसेच संयोजन समिती बीडचे नितीन क्षीरसागर यांचे मनःपूर्वक आभार मानले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## हनुमान बाल गणेश मंडळ अंमळनेर गणपतीचे उत्साहात विसर्जन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील अंमळनेर (भां) येथील हनुमान बाल गणेश मंडळाने गणपती विसर्जन भारतीय संस्कृती, परंपरा राखत अतिशय उत्साहात पार पाडले. शनिवारी दुपारी गणपती मिरवणुकीमध्ये सर्व बालक यांनी मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन मोठ्या उत्साहात गणरायाचे विसर्जन केले.दहा दिवसांमध्ये दररोज आरती तसेच बालकांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.**

गणपती विसर्जनाच्या दिवशी गणरायाचे सुमधुर संगीताच्या साथीत विसर्जन करण्यात आले. कु.ईश्वरी हडतगुणे, समृद्ध हडतगुणे,कादंबरी आपरे,श्रेया आपरे, स्वरा हडदगुणे,श्रेया हडतगुणे, लावन्या अष्टेकर,समृद्धी वनारसे, रेवती पखाले,स्वामीनी शेवंते,नेत्रा पखाले,नक्षत्रा बेद्रे,सई पवार,अक्षरा बेद्रे,अवनी कदम,आर्या पोकळे, तनुजा पोकळे,नारायणी वनारसे, अर्पिता खोसे,समर्थ शेवंते,गोलू पोकळे,श्रीरंग बेदरे,आर्यन बुरसे, श्रेयश शेवंते,समर्थ बुरसे,गणेश कांबळे,साई आष्टेकर,अवधुत पात्रुडकर,शिवांश पांगरे,दर्शन कदम,साई पांगरे,वेदांत पात्रुडकर, गोलू मंगेश पोकळे,अंतरिक्ष पात्रुडकर, स्वराज हडतगुणे,विराज हडतगुणे, यश पोकळे यांच्यासह सर्व हनुमान बाल गणेश मंडळातील सदस्यांनी वाजत गाजत गणरायाला निरोप दिला.शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वामी विवेकानंद शाळेमध्ये बाल गणेश कल्याण मंडळ आयोजित व्याख्यानमालेचा कार्यक्रम संपन्न

# निरोगी शरीरासाठी स्वत:च रक्षक बनने आवश्यक आहे-डॉ.स्नेहा भराडिया

**केज । प्रतिनिधी**

**जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग शाळेमध्ये बालगणेश कल्याण मंडळाच्या वतीने दि. ३० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ यादरम्यान व्याख्यानमालेचा कार्यक्रम संपन्न झाला. या व्याख्यानमालेसाठी परिसरातील व्याख्यात्यांना व्याख्यानासाठी निमंत्रित केले जाते. यावर्षी दि. ३० सप्टेंबर रोजी बाल गणेश व्याख्यानमालेचे पहिले पुष्प माजी सैनिक तथा कवी जनार्दन सोनवणे यांनी गुंफले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक अजय देशपांडे हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी उपस्थिती दर्शवली.**

कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमा पूजनाने झाली. याप्रसंगी बाल गणेश मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शुभारंभाचे पुष्प गुंफताना '' आपल्या जीवनातील शिस्तीचे महत्त्व '' या विषयावर बोलताना जनार्दन सोनवणे म्हणाले, शिस्त या शब्दाची उकल अशी केली की, शिस्त म्हणजे शिष्य + इति अर्थातच या शब्दातून शिष्याने कसे वागावे याचे निर्देशन केले जाते. माणसाला त्याचे गुरू म्हणजेच आई आणि त्यानंतर शिक्षक शिस्तीचे धडे देत असतात. माणूस हा आयुष्यभर निरंतर शिष्यच असतो. म्हणजेच शिष्याने नेहमीच शिस्तीत राहायला हवे. मोठे व्हायचे असेल तर केवळ शिस्त अंगी बाळगा. अध्यक्षीय समारोपात अजय देशपांडे म्हणाले, शिक्षण हे संस्कारक्षम असले पाहिजे. आणि ते शालेय जीवनापासूनच आत्मसात केले पाहिजेत. आपले जगणे हे निस्वार्थ असले पाहिजे. तसेच परस्पर सहकार्याची भावना आपण स्वतःमध्ये वृंद्धीगत केली पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हरी चौरे याने केले. तर आभार आदित्य सूर्यवंशी याने मानले. दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प '' संस्कारक्षम शिवचरित्र ''या विषयावर सेवानिवृत्त शिक्षक श्री. हनुमंत घाडगे यांनी गुंफले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षक संदिप शेंडगे होते. याप्रसंगी बोलताना हनुमंत घाडगे म्हणाले, संस्कार हे अनुकरणातून होत असतात. विद्यार्थी अनुकरणातून शिकत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग हा विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी अंधश्रध्देला कधीही प्रोत्साहन दिले नाही. शिवचरित्रातून आपल्याला परस्त्रीला मातेसमान वागणूक दयावी तसेच आई- वडिलांवर प्रेम करावे ही शिकवण मिळते राजमाता जिजाऊंच्या प्रेरणेने स्वराज्य स्थापनेचा संकल्प छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. सर्वधर्मसमभावाची शिकवण आपणास शिवचरित्रातून मिळते. मराठा मावळे (तसेच प्रदेशासाठी वापरला जाणारा शब्द) सैन्याला जोखीम देत असताना त्यांच्या कुटुंबाची काळजी घेण्याची जबाबदारी शिवाजी महाराज घेत असत. आजकालचे राजकारण गलिच्छ झाले असून आज प्रत्येकाने शिवचरित्र आवश्य वाचावे. समाजात कसे वावरावे, सर्वधर्मसमभाव कसा असावा, राष्ट्रप्रेम कसे असावे. ही सर्व मूल्ये समजून घेण्यासाठी शिवचरित्र वाचने आवश्यक. विद्यार्थ्यांबर नव्हेच तर सकल समाजाला समानतेची शिकवण शिवचरित्राद्वारे मिळते. चंद्र-सूर्य-तारे आहेत तोपर्यंत शिवचरित्राची ख्याती असेल. अध्यक्षीय समारोपत संदिप शेंडगे म्हणाले, बदल घडवून आणण्यासाठी फार मोठ्या संख्येची आवश्यकता नसते. परंतु योग्य दिशा व नेतृत्व समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आदित्य सूर्यवंशी यांनी केले. तर आभार संस्कृती जाधव हीने मानले. दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प '' आरोग्य व आहार '' या विषयावर डॉ. स्नेहा भराडिया यांनी गुंफले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे या होत्या. याप्रसंगी बोलताना डॉ. स्नेहा भरडिया म्हणाल्या, आजार होण्यापूर्वीच आपण दक्षता घेतली पाहिजे. सध्याच्या या धकाधकीच्या जीवनामध्ये दिनचर्या आयुर्वेदाच्या सहाय्याने पाळणे गरजेचे आहे. हितकारक गोष्टीचे मोजमाप म्हणजे आयुर्वेदः आयुर्वेदानुसार दिनचर्चा व ऋतुचर्या पाळणे. विद्यार्थ्यांसाठी ७ ते ८ तास मुबलक झोप असावी. प्राकृतीनुसार आहारात बदल, वैयक्तिक स्वच्छता, पचनशक्ती चांगली राहण्यासाठीचा आहार, कोणत्याही आजाराचे मुळ हे पचनक्रिया असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी पचनशक्ती सुधारण्याकडे लक्ष दिले पाहिजे. आजच्या काळातील नवनवीन पदार्थांचे सेवन कमी करून घरचे अन्न खाल्ले पाहिजे. खरं पाहता निरीक्षणातून बदल घडवून आणले पाहिजेत. स्वतःच स्वतःचे रक्षक बनने आजच्या काळात आवश्यक आहे. विद्यार्थी दशेत योग्य नियोजन व नियमन करून आपल्या आरोग्याचे व अभ्यासाचे संवर्धन करावे. अध्यक्षीय समारोपात शिवनंदा मुळे म्हणाल्या, '' .'' स्वतःच्या प्रकृतीचे स्वतःच निरीक्षण केले पाहिजे. चांगल्या आहारामुळे आपल्या शरीर सुदृढ बनते व त्यामुळे आपल्या सर्वांगीण विकासही होतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अस्मिता जमाले हिने केले तर आभार मोहिनी गुंड हिने मानले. दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गीत-गायन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे या उपस्थित होत्या. सदरील स्पर्धेसाठी शाळेतील एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदरील बालगणेश कल्याण मंडळ व्याख्यानमालेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे सहाय्यक कल्याण आदमाने, सर्व विद्यार्थी पदाधिकारी- अध्यक्ष मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, उपाध्यक्ष अजय गुंड, सचिव मंजू गुंड, सहसचिव स्वरा राऊत, कोषाध्यक्ष जगदीश गलांडे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कल्याणी मुंडे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

### अंबाजोगाईत खग्रास चंद्रग्रहणाचा

हा उपक्रम अत्यंत चांगला झाला. खग्रास चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर रविवार ०७ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ ते ७.३० या वेळेत पूज्य बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या रोबोटीक लॅब सभागृहात भिती सोडूया-चंद्रग्रहण पाहुया या विषयावर *खगोलअभ्यासक हेमंत धानोरकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हेमंत धानोरकर यांनी झझढ प्रेझेंटेशनव्दारे दिलेल्या व्याख्यानातून खग्रास चंद्रग्रहणाबाबतची सर्व प्रकारची माहिती सांगितली. चंद्रग्रहणाची संकल्पना, ग्रहणाचे प्रकार, ग्रहणातील विविध अवस्था, ग्रहण पाहण्याच्या सुरक्षित पद्धती, ग्रहणांबाबतच्या अंधश्रद्धा, ग्रहणांचे वैज्ञानिक महत्व अशा अनेक मुद्दयांची माहिती देताना हेमंत धानोरकर यांनी व्याख्यानातून उपस्थित विद्यार्थ्यांना ग्रहण पाहण्यास प्रोत्साहित केले.

-------------

### गावकऱ्यांचे बेमुदत

नोंद अतिवृष्टी म्हणून झाली नाही, याला कारणीभूत झोपेचे सोंग घेतलेले प्रशासनच आहे, कुंपणाने शेत खाल्ले तर दाद कोणाकडे मागणार ? अशी परिस्थिती झाली आहे, कारण गंगामसला परिसरात लावलेला पर्जन्यमापक खराब झाल्याने पावसाची नोंदच झाली नाही, आणि नोंद न झाल्यामुळे या परिसराची अतिवृष्टीत दखल घेतली गेली नाही, याला पूर्णतः प्रशासन जबाबदार असून फटका मात्र सामान्य नागरिकांना बसत आहे, तरी अतिवृष्टीची नोंद करून सरसकट अतिवृष्टीची एकरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्यांचे संपुर्ण कर्ज माफ करावे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेने शेतकऱ्यांच्या बचत खात्याला केलेले स्थगित (होल्ड) हटविण्यात यावे, मोठेवाडी शिवारातील सरसकट पांदण रस्त्याचे मुरूम,खडीकरण करण्यात यावे या प्रमुख मागण्या बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलनात करण्यात आल्या आहेत.या आंदोलनात कॉ.सुदर्शन हिवरकर,भाई ड.नारायण गोले, ड. पांडुरंग गोंडे, प्रभाकर खेत्री, चक्रधर हिवरकर, ज्ञानेश्र्वर खेत्री, नामदेव यादव, जगन्नाथ खेत्री व समस्त गावकरी सहभागी झाले आहेत.

-------------

### महिलां,तरुणींचा सुरक्षेचा

त्यानीच पाळलेले गुंड मौल्यवान वस्तुसह किमंती मोबाईल चोरी करीत आहेत तर कहीजण महिलां तरुणीं याना खेळणीचे आमीष दाखवुन नाही ते क्रत्य करित असल्याची जोरदार चर्चा होत असल्याने या आनंदनगरीत महिलां,तरुणींची सुरक्षा धोक्यात आली असल्याची ही चर्चा होत असल्याने या आनंद नगरीच्या नावाने होत असलेली सर्व सामान्य नागरिकांची आर्थिक लुट प्रशासनाने थांबवावी.या मागणीसह आनंदनगरीत महिलां तरुणींने जाऊ नये असे आव्हानच सुज्ञनागरीकाने केले आहे.

-------------

### शेतकरी बांधवांनी

कापुस खरेदी साठी शेतक-यांची नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे या योजने अंतर्गत कापुस विक्री करू इच्छीणाऱ्या शेतकऱ्यांनी कपास किसान हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलेले आहे. या ॲप वर सर्व शेतकरी बांधवांनी नोंदणी करावी असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती संभाजीराव शिंदे यांनी केले आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती, वडवणीच्या कार्याक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी दिनांक ३० ऑगस्ट २०२५ नंतर आपल्या मोबाईलमध्ये किसान ॲप प्ले स्टोअर वरून डाऊनलोड करून दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून घ्यावी. ३० सप्टेंबर २०२५ ही नोंदणीची अंतीम तारीख असणार आहे.३० सप्टेंबर २०२५ नंतर नोंदणी करता येणार नाही. नोंदणी करण्यासाठी पुढील प्रमाणे कागदपत्रे सोबत असणे गरजेचे आहे. १) सातबारा उतारा २) सातबारा उतारावर चालु हंगाम मध्ये कापुस पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. ३) आधार कार्ड ४) शेतक-यांचा फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत. तरी वडवणी कार्यक्षेत्रातील कापुस उत्पादक शेतकरी बांधवांनी सदरच्या ॲपवर जास्तीत जास्त नोंदणी करून घेण्यात यावी. असे आवाहन बाजार समिती वडवणीचे सभापती, संभाजी शिंदे यांनी केले आहे.

-------------

### आष्टी नगरपंचायतच्या

भारत मुरकुटे, नगरसेवक श्याम वाल्हेकर,नगरसेवक अक्षय धोंडे,नगरसेवक अरुण निकाळजे, नगरसेवक बाळासाहेब घोडके, बांधकाम अभियंता गहिनीनाथ शिरसाठ,अभियंता अथर बेग,कर प्रशासकीय अधिकारी प्रवीण उंदरे, जगदीश नरवडे,कानडे,नगरपंचायत कर्मचारी शिवकुमार तांबे, दिलीप निकाळजे,संजय निकाळजे,चंद्रकात म्हस्के आदींनी परिश्रम घेतले.

-------------

### मंडीचा राजा गणपती मिरवणूकीत

होती. प्रत्येक मंडळाकडून वेगवेगळे देखावे सादर करण्यात येत होते. त्यामध्ये लेझीम , मल्लखांब , दोरी आदी खेळ खेळवले जात होते. मात्र गणेशमूर्तीला सुवर्णचरण व मिरवणुकीत मूर्तीला दुग्धभिषेक होण्याची ही अंबाजोगाई च्या इतिहासातील प्रथमच अशीच घटना असल्याने याची चर्चा सर्वत्र होताना दिसून येत आहे. व्यंकटेश गणेश मंडळाच्या मंडीचा राजाच्या गणपतीमुळे अनेक गणेश भक्तांच्या मनोकामना पूर्ण झाल्यामुळे याची नवसाला पावणारा गणपती म्हणून देखील ख्याती होत आहे. अनेक भक्तांच्या कडुन या गणेश मंडळास रोख , सोने चांदी व अन्य वस्तूंच्या देणग्या देखील मोठ्या प्रमाणावर मिळत असल्याची माहिती या गणेश मंडळाचे अध्यक्ष विबिशन भालेकर तसेच व्यंकटेश गणेश मंडळाचे विश्वस्त ॲड किरण भालेकर यांनी दिली आहे. संपूर्ण गणेशोत्सवाच्या काळात तसेच मिरवणुकी दरम्यान मंडळाची शिस्त ही देखील वाखाणण्याजोगी अशीच होती.

----------

## पान १ वरून...

### १७ सप्टेंबरच्या आत कुणबी

असल्याचे सांगितले आणि मराठ्यांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याची सूचना केली. मराठवाड्याला १०० टक्के आरक्षण मिळेल, पण सर्वांनी संयम ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले. जरांगे म्हणाले, ''आम्ही गरीब मराठा तरुणांनी सरकारला कुणबी प्रमाणपत्राचा शासनादेश (जीआर) काढायला भाग पाडले. हा जीआर इतका मजबूत आहे की, यामुळे अर्धा महाराष्ट्र अस्वस्थ झाला आहे. काही अभ्यासकांना झोप लागत नाही, तर काहींना याची चीड आली आहे. पण जर सरकारने कुणाच्या दबावाखाली येऊन या जीआरमध्ये बदल केले, तर आम्ही मोठा निर्णय घेऊ.'' त्यांनी सरकारला स्पष्ट सूचना दिली की, हैद्राबाद गॅझेटियरच्या नोंदीनुसार ज्या मराठ्यांच्या नोंदी नाहीत, त्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी. मराठवाड्याला १०० टक्के आरक्षण मिळणार असल्याचा विश्वास जरांगे यांनी व्यक्त केला. जरांगे म्हणाले, ''येवल्याच्या लोकांचं ऐकू नका. तुम्ही आमच्या मागे लागलात, तर आम्हीही तुमच्या मागे लागू. मला ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण मान्य नाही. वेळ आल्यावर आम्ही जशास तसे उत्तर देऊ,'' असे त्यांनी ठणकावले. तसेच, १९९४ चा जीआर रद्द करण्याची मागणीही त्यांनी लावून धरली. मराठा आंदोलकांवरील गुन्ह्यांच्या मुद्द्यावर बोलताना जरांगे म्हणाले, ''आम्ही कोणावर हल्ले केले नाहीत, उलट आमच्यावरच हल्ले झाले आहेत. आझाद मैदानावर विखे पाटील यांनी मराठा तरुणांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता व्हायला हवी.''

--------

### एका समाजाला न्याय मग

सरकारकडून का नाही म्हणत जिल्ह्यातील बंजारा बांधकडून मोर्चाची पूर्व दिशा ठरविण्यासाठी भव्य बैठक घेण्यात आली. या बैठकीला व्यापक स्वरूप नाल्याचे दिसून आले. पंधरा ते वीस हजार संख्येने जिल्ह्यातील बंजारा बांधव शहरातील सौभाग्य लॉन्स येथे उपस्थित राहिले. मात्र जागा अपुरी पडल्याने रस्ता पूर्ण जाम झाला होता. बैठकीची कसलीही कल्पना प्रशासना देण्यात आलेली नव्हती परंतु शहरात दाखल होणारे बंजारा बांधव पाहून पोलीस प्रशासन अलर्ट होत बंदोबस्त तैनात करण्यात आले होते. मात्र १५ ते २० हजाराने दाखल झालेल्या बांधवाकडून घेण्यात आलेल्या निर्णयात येत्या १५ सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे ठरले असल्याचे निर्णय घेण्यात आले. शासनाकडून मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून न्याय देण्यात आले मग आमच्यावर अन्याय का असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण देण्यात आले होते. ते आरक्षण देण्याची मागणी करत बैठक पार पडली. यावेळी समाजातील अनेक तज्ञ मंडळींकडून समाजाला मार्गदर्शन करण्यात आले. ही बैठक समस्त बंजारा समाज या नावाखाली पार पडली. यावेळी आलेल्या समाज बांधवांना १५ सप्टेंबर रोजी निघणाऱ्या मोर्चा संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रा.पी.टी. चव्हाण, बी.एम.पवार, सेवानिवृत्त लेखा अधिकारी उत्तम चव्हाण, संपत चव्हाण, अरुण पवार, रविकांत राठोड, ॲड.संगीता चव्हाण, ॲड.शरद चव्हाण, रामेश्वर पवार, अर्जुन चव्हाण, जगनाथ चव्हाण, अंकुश राठोड, सुरेश पवार, उद्योजक राम राठोड, उद्योजक राजेश राठोड यांच्यासह आदींनी मत व्यक्त केले.

----------

### उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी

जातात, तर सुदर्शन रेड्डी हे संविधानिक मूल्ये आणि लोकशाही तत्त्वांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत लोकसभा (५४३), राज्यसभा (२३३) आणि राष्ट्रपतींद्वारे नियुक्त १२ असे एकूण ७८२ खासदार मतदान करतील. विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे. एनडीएला लोकसभेत २९३ आणि राज्यसभेत १३० अशा एकूण ४२३ खासदारांचा पाठिंबा आहे, ज्यामुळे राधाकृष्णन यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. इंडिया आघाडीकडे ३१२ खासदारांचा पाठिंबा आहे, आणि आघाडीबाहेरील ४८ खासदारांनी रेड्डी यांना पाठिंबा दिला तरी त्यांची संख्या ३६० पर्यंतच पोहोचेल, जी बहुमतासाठी अपुरी आहे. राज्यसभेचे सरचिटणीस पी. सी. मोदी हे निवडणूक अधिकारी असतील. मतदान ९ सप्टेंबरला सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संसद भवनात होईल. मतमोजणी संध्याकाळी ६ वाजता सुरू होईल, आणि त्यानंतर निकाल जाहीर होईल. ही निवडणूक एकल हस्तांतरणीय मत पद्धतीने होते आणि प्रत्येक खासदाराचे मत समान मूल्याचे असते. व्हीप लागू नसल्याने क्रॉस-वोटिंगची शक्यता असली, तरी एनडीएच्या संख्याबळामुळे त्याचा फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही.

------------

### उमाजी नाईक महामंडळाकडून

मावळ्यांप्रमाणेच त्यांनी गनिमीकाव्याच्या सहाय्याने ब्रिटिशांना धडा शिकवला. समाजाच्या शौर्याची परंपरा आजही जिवंत असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाला २ लाख रुपयांपर्यंतचे बिनतारण कर्ज, तर उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पोलिस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण व प्रशिक्षणाकरिता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना राबवल्या जातील, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

---------

### राजकीय लढाईसाठी न्यायालयाचा

केल्याचा आरोप प्रदेश भाजपने केला होता. त्यावरुन भाजपने मानहानीचा खटला दाखल केला. मात्र, तेलंगणा उच्च न्यायालयाने हा मानहानीचा खटला रद्द करण्याचा आदेश दिला. उच्च न्यायालयाच्या आदेशाला तेलंगणा भाजपने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने देखील तेलंगणा भाजपची याचिका फेटाळून लावली. या प्रकरणात हस्तक्षेप करणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. आम्ही वारंवार सांगत आहोत की सर्वोच्च न्यायालयाचा वापर राजकीय लढाईसाठी करू नका. जर तुम्ही राजकारणी असाल तर तुमची चामडी जाड असायला हवी, असे खंडपीठाने म्हटले. राजकारणी असाल तर तुमच्याकडे या सर्व गोष्टी सहन करण्याची क्षमता असली पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे. दरम्यान, भाजपने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात रेवंत रेड्डींवर आरोप करण्यात आले होते. रेड्डी यांनी काँग्रेस पक्षाशी संगनमत करून भाजप आरक्षण संपवेल अशी ''खोटी आणि संशयास्पद राजकीय वक्तव्य'' केली असा आरोप खटल्यात केला होता. ऑगस्ट २०२४ मध्ये ट्रायल कोर्टाने रेड्डी यांना नोटीस बजावली. त्यानंतर काँग्रेस नेत्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने १ ऑगस्ट रोजी मानहानीचा खटला रद्द करण्याचे आदेश दिले.

-----------

### बोगस शिक्षक भरती घोटाळा

सरस्वती विद्यालय, वडवणी येथील माध्यमिक विद्यालय, दिंद्रुड येथील माध्यमिक विद्यालय, टाकरवण येथील माध्यमिक विद्यालय, वाहेगाव आमला (ता. अंबाजोगाई) येथील श्रीहरी विद्यालय, अंबाजोगाई येथील वेणुताई चव्हाण कन्या विद्यालय आणि घाटनांदूर येथील शंकर विद्यालयाची चौकशी केली जाणार आहे. तसेच या शाळांची चौकशी झाल्यानंतर आवश्यक ते अभिलेखे व पुराव्यासह तात्काळ तीन दिवसांच्या आत याचा अहवाल शिक्षण उपसंचालकांना सादर केला जाणार आहे. तर हा अहवाल प्राप्त होताच शिक्षण उपसंचालकही तो अहवाल एसआयटीला सादर करणार आहेत. त्यामुळेच बीड जिल्ह्यातील बोगस शिक्षक भरती घोटाळा व थकीत वेतन घोटाळा करणारे संस्थाचालक व बीड जिल्ह्यातील अधिकारी व शालार्थ आयडी देणारे उपसंचालक शिक्षण विभाग कार्यालयातील अधिकारी या चौकशीनंतर लवकरच पुढे येतील असाच काहीसा प्रकार बीड तालुक्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात झाला असल्याची चर्चा आहे लाखो रुपये घेऊन पात्रता नसतानाही शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली गेली आहे ती आता चौकशीत निष्पन्न होईलच मात्र आता नेमलेल्या पथकामुळे अनेक संस्था चालक आणि कर्मचाऱ्यांची पाचावर धारण बसली आहेत.

cmyk

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०९ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...

### रूपाली पुसकर सेट परीक्षेत यशस्वी

अंबाजोगाई । प्रतिनिधी



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित साहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षेचा (सेट) निकाल जाहीर झाला. यामध्ये कै.दे.बा.गणगे योगेश्वरी प्राथमिक विद्यालयाच्या सहशिक्षिका रूपाली कालिदासराव पुसकर या साहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणारी सेट (राज्य पात्रता परीक्षा) उत्तम गुणांनी यशस्वी झाल्या आहेत. रुपाली पुसकर यांनी मराठी या विषयातून परीक्षा उत्तीर्ण केली आहे.या परीक्षेसाठी मेहनत घेताना कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना झालेल्या सहकार्यामुळे या यशाचे श्रेय त्या त्यांच्या आई व सासूबाई यांना देतात. शाळेतील तसेच घरातील सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पूर्ण करून या परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.



**माजलगाव; शहरातील नवनाथ नगर येथील जयहिंद गणेश मंडळाचे विसर्जन मिरवणुक आनंदी व उत्साही वातावरण पार पडली.यात उत्कृष्ट सामाजिक देखावे व स्थानिक कलाकाराने पोतराज देखावा, दक्षिण भारतातील कांतरा देखावा, महिषासुर वध सादर केली व थरारक प्रत्याषिकाने माजलगाव शहरातील प्रेक्षकांची मने जिंकली. जयहिंद गणेश मंडळ नवनाथ नगर माजलगावचे अध्यक्ष अशोक गायगवे, सचिव बालाजी कुमावत मंडळाच्या सर्व सदस्यांसह व शेकडो पुरुष व महिला भाविक भक्तांने सहभागी घेतला होता**

### मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टात कॅव्हेट दाखल –गंगाधर काळकुटे

बीड । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक मराठा सेवक गंगाधर काळकुटे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले

मनोज जरांगे पाटील यांचे समर्थक गंगाधर काळकुटे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. पाच पानांचे कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. मराठा समाजाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही जीआर रद्द करु नये किंवा याबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आम्हाला विचारात घ्यावे असं या कॅव्हेटमध्ये म्हटलं आहे. मराठा आरक्षण आणि हैदराबाद गॅझेटला होणारा विरोध लक्षात घेता काळकुटे यांच्या माध्यमातून हे कॅव्हेट दाखल केले आहे.

ओबीसी समाज न्यायालयात या गॅझेटला आव्हान देण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालयाकडून या जीआरला स्थगिती देण्याची परिस्थिती निर्माण झाली तर मात्र मराठा समाजाला म्हणणं मांडता येईल. त्यानंतर कोणताही कायदेशीर निर्णय हा घेतला जाऊ शकतो. काही लोक न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं काळकुटे यांच्या माध्यमातून कॅव्हेट दाखल करण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करुनच हे कॅव्हेट दाखल झाल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली आहे. हैदराबाद गॅझेटमुळं कोणत्याही समाजाला धोका नाही. हे न्यायालयात सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात काही जणांकडून जीआर विरोधात याचिका दाखल केल्याची काळकुटे यांनी माहिती दिली आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा तिढा सोडवला मात्र काही जणांकडून याला विरोध केला जात आहे. त्यामुळं हे कॅव्हेट असल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली आहे.



म्हसोबावाडी : आष्टी तालुक्यातील व मोशी (आळंदी) येथे उद्योजक नाथ कृपा ग्रुप संस्थापक बाळासाहेब अडसरे यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली असता यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख यांना दै.युवक आधार सेवा रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी कौतुकास्पद सत्कार केला या शुभ प्रसंगी युवा पत्रकार संघ आष्टी तालुका अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार समीर शेख,प्रेम पवळ, कृष्णा शेकडे,ज्ञानोबा मोकाशी सह आदी मान्यवर उपस्थित होते.

# बीड ते परळी रेल्वेमार्ग भूसंपादणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात लवकरच रेल्वे सुरु होणार असून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. परंतू बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाबाबतचे अडथळे सर्व संबंधीत विभागानी दूर करून, भूसंपादन कामाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या.**

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहा.कार्यकारी अभियंता मुकुंद पुं. नाईक, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी श्री. अरविंद लाटकर, श्रीमती वसीमा शेख, श्री. गौरव इंगोले यांनी बैठकीत सहभाग घेतला. जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वेमार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे सर्व संबंधीत विभागाने समन्वय साधून तातडीने निकाली काढून रेल्वे मार्गासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. राष्ट्रीय राज्यमार्ग विभागाने ब्रम्हवाडी येथील उड्डानपूलाचे काम लवकरात लवकर सुरु करावे. तसेच सर्व संबंधीत उपविभागीय अधिकारी यांनी भूसंपादना बाबतची प्रक्रिया वेळेत पूर्ण करुन अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले.



## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली बीड रेल्वेस्थानकाची पाहणी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज बीड येथील रेल्वे स्थानकास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करत येथील कामांची माहिती घेतली. यावेळी श्री. जॉन्सन यांनी दि. १७ सप्टेंबर रोजी बीड ते परळी रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाच्या अनुषंगाने संबंधित विभागांस योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच रेल्वे स्थानकातील सर्व सुविधाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी श्री जॉन्सन यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, कार्यकारी अभियंता मध्य रेल्वे अहमदनगरचे लोकेंद्र कुमार सिंग, वरिष्ठ अभियंता एल.पी. नायक, वरिष्ठ अभियंता अमरकुमार अकेला, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल यांची उपस्थिती होती.

## सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्मानीत

बीड । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे वंचित उपेक्षित घटकातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी करत असलेल्या कार्ये , ऊसतोड कामगार, स्थलांतरीत कामगार ,विटभटी कामगार,भटके विमुक्त समाजातील लोक व एकल महिला व बालकांच्या हक्कांच्या संदर्भात करत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांना राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बीड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जीतीन रहेमान साहेब,

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी आदरणीय मेश्राम मॅडम,उपशिक्षणाधिकारी आदरणीय जमीर शेख सर , इतर मागास प्रवर्ग विकास विभागाचे संचालक दत्तात्रय क्षिरसागर,संध्याताई राजपूत,भटक्या विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जोगी, सामाजिक कार्यकर्ते ओमप्रकाश गिरी, अॅड जाधव, बालाजी पवार, दादासाहेब नन्नवरे यांच्यासह मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. केज तालुक्यातील मौजे जोला येथील भुमिपुत्र बाजीराव नवनाथ ढाकणे हे ऊसतोड कामगार, स्थलांतरीत कामगार विटभटी कामगार, भटके विमुक्त समाजातील लोक व एकल महिला व बालकांच्या हक्कांच्या संदर्भात करत असलेल्या सामाजिक कार्याच्या १५ वर्षाच्या प्रदिर्घ कार्याची दखल घेऊन रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात श्री बाजीराव नवनाथ ढाकणे यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान साहेब व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय ग्रंथ, शाल, श्रीफळ देऊन सन्माननीत करण्यात आले.



## फार्मसी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच शिक्षक दिन हा अत्यंत उत्साही, कृतज्ञतापूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्याला फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या मनोगतपर भाषणात त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याचा आदरपूर्वक गौरव करण्यात आला. शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून ते समाज परिवर्तनाचे शिल्पकार असल्याचे प्राचार्य तरके यानी सांगितले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षण, चारित्र्य आणि जबाबदारी यांचे महत्व या कार्यक्रमात दरम्यान पटवून दिले.त्याचबरोबर शिक्षकांविषयी आपल्या भावना प्रकट केल्या. गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः... या संकल्पनेवर आधारित भाषणाद्वारे विद्यार्थ्यांनी गुरुजनांबद्दल आपले प्रेम व आदर व्यक्त केला. काही विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या कार्यावर आधारित स्वरचित कविता सादर केल्या, ज्या सर्वांच्या मनाला भावून गेल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि संयोजन महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त सहभागातून करण्यात आले. त्यांनी या कार्यक्रमासाठी मेहनत घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, शिक्षक दिन केवळ एक औपचारिक दिन नसून हा शिक्षकांच्या योगदानाची जाणीव करून देणारा दिवस आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणाची रुजवणूक होते आणि समाजप्रती जबाबदारीची भावना निर्माण होते.

## ईद ए मिलाद निमित्त उत्साहात निघाली ध्वज मिरवणूक

### गणेश उत्सवामुळे सोमवारी ईद साजरी

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

ईद ए मिलाद हा सण गणेश उत्सव काळात येत असल्याने दोन दिवस उशिरा दि.८ सोमवारी ईद ए मिलादचा जुलूस ऐ मुहम्मदी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

आज दि.८ सोमवार रोजी धारुर शहरात ईद ए मिलादुन्नबी निमित्त ध्वज मिरवणूक काढण्यात आली. काल दि.७ रविवारी प्रतिवर्षी प्रमाणे शहरातून शांतता बाईक रली काढण्यात आली. आज सकाळी ९ वाजता शहरातील गुलजार मस्जीद येथून पारंपारिक ध्वज मिरवणूकीस प्रचंड उत्साहात सुरुवात करण्यात आली. शहरातील विविध भागातील तरुणांनी मिरवणूकीत मोठा सहभाग नोंदवला. प्रेषित महंमद पैंगबर यांच्या गौरवार्थ कलाम व नात गायन करत ध्वज मिरवणूक दुधियापुरा, कुरेशी मोहल्ला, मोमीन गल्ली, झारे गल्ली, उदयनगर मार्गे छत्रपती शिवाजी चौकात आली. यानंतर शिवाजी चौक ते प्रमुख रस्त्याने काशिनाथ चौक बाराभाई गल्ली, दुधियापुरा मार्गे गुलजार मस्जीद येथे ध्वज मिरवणूकीचा समारोप करण्यात आला. या मिरवणूकीत अबाल वृध्दांसह तरुणांची संख्या लक्षणीय होती. यावर्षी प्रथमच मिरवणूकीत मुस्लिम धर्मियांचे पवित्र स्थळ मक्का व मदिना येथील काबा व मदिना मुन्नवरा यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करण्यात आल्या. गुलजार मस्जीद येथे समारोपात सलाम व फातेहाखानी होवून सर्वसामान्यांसाठी अन्नदान करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## अप्पर कुंडलिका धरणातून तिगाव, चिंचोटी, मामला साठवण तलावात पाणी न सोडल्यास १७ सप्टेंबरपासून उपोषण करणार - ॲड. राज पाटील

वडवणी । प्रतिनिधी

मराठवाडा काही भाग सध्या दुष्काळाच्या झळा सहन करत आहे. शेतकरी धरणात पाणी नसल्याने हवालदिल झाले आहेत. उन्हाळ्यात गावोगाव शेतीला व पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणार आहे. अशा गंभीर परिस्थितीत बीड जिल्ह्यातील माजलगाव, सोनाखोटा, ऊपळी धरणासह जवळजवळ ९० टक्के धरण १०० टक्के भरलेले आहेत. परंतु वडवणी तालुक्यातील चिंचोटी, मामला, तिगाव साठवण तलाव अद्याप ५०% च्या आसपास आहेत. मागील दोन महिन्यापासून वरील गावातील लोक जिल्हाधिकारी, आमदार व पाटबंधारे विभागाकडे अप्पर कुंडलिका धरणाचे पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करत आहेत. परंतु प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत लढा दुष्काळाशी फाउंडेशन महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष ड. राज पाटील यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिन पर्यंत वरील धरणात पाणी न सोडल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हजारो नागरिकासह उपोषण करण्याची भूमिका घेतली आहे.

शंभर टक्के भरलेल्या अप्पर कुंडलिका धरणातून पाणी सोडण्याची मागणी मागील तीन महिन्यापासून सातत्याने केली जात असताना, माजलगाव धरण भरले नसल्यामुळे आतापर्यंत पाणी सोडले नाही परंतु आता माजलगाव सह इतर सर्व धर्म शंभर टक्के भरलेले असताना



चिंचोटी, तिगाव आणि मामला धरणात पुरेसे पाणी साठा नसतानाही शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले जात नाही. भविष्यात पिके वाचवण्यासाठी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने धरणातून पाणी सोडावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांची दुर्दशा होणार असून, आत्महत्या वाढण्याचा धोका असल्याची खंत ॲड.राज पाटील यांनी व्यक्त केली.

उपोषणाची चेतावणी

१७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती दिन. या ऐतिहासिक दिवशी आपण जलसंकटा विरोधात रणशिंग फुंकणार आहोत. जर प्रशासनाने तत्काळ पाणी सोडले नाही, तर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहोत, असा ठाम इशारा ड. पाटील यांनी दिला.

सरकारकडे थेट प्रश्न शेतकऱ्यांच्या जिवावर दुष्काळाचा घाला का? धरणात शंभर टक्के पाणी साठा असतानाही वाहून जाणारे पाणी शेतकऱ्यांना न देणाऱ्या निगरगट्ट प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यात येत आहे. पाणी ही मूलभूत गरज असूनही शेतकऱ्यांवर अन्याय का? या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांचा वाढता रोष दरम्यान, या घोषणेमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. अनेक शेतकरी संघटना व कार्यकर्त्यांनी या आंदोलनाला पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली आहे. पिके वाचवण्यासाठी आणि जनतेला पाणी मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन पेट घेईल, असे संकेत मिळत आहेत. शेवटी ॲड. पाटील यांचा इशारा दुष्काळ ही केवळ निसर्गाची देणगी नसून, शासनाची बेफिकीरी व चुकीच्या धोरणांची देणगी आहे. आता गावोगावच्या जनतेने जागृत होऊन पाण्यासाठी लोकलढा उभारला पाहिजे. शेतकऱ्यांचा जीव आणि शेती वाचवण्यासाठी पाणी कातडीने सोडलेच पाहिजे. अन्यथा कठोर आंदोलन होईल, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने श्री सुनिल शांताराम काटकर रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड यांचे मालकीची व ताब्यात असलेली कसबे बीड मोहल्ला करीमपुरा येथील सहन जागा शहर भुमापन क्रमांक ३६९० पैकी असा मिळालेला आहे. व बीड नगर परिषद मालमत्ता क्र.जुना ३-१२-२२ पैकी नवा ३-१२-१३५ असा मिळालेला आहे. जिची लांबी पूर्व-पश्चिम ६० फुट व रुंदी दक्षिण-उत्तर २५ फुट असून एकूण क्षेत्रफळ १५०० चौरस फुट असून जिची चतुर्सिमा पूर्वेस-महेश गोवर्धन पारीख यांचे घर पश्चिमेस-विठ्ठल मंदीरची जागा, दक्षिणेस-दिलीप आसनानी (सिंधी) यांची जागा येणे प्रमाणे वर्णन असलेली सहन जागा माझे पक्षकाराने कायम खरेदी करण्याचा ठराव केला असून विक्रेत्याने सदरील जागा निर्विवाद व बीन बोजाची असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर जागेमध्ये कोणाचे काही हितसंबंध जसे की इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, आममुखत्यारपत्र इत्यादी स्वरूपाचे हक्क व अधिकार असल्यास संबंधिताने सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाले पासून तीन दिवसाचे आत खालील पत्त्यावर आपला आक्षेप तीन दिवसाचे आत खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदरील जागा निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार कायदेशीर खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट**
**कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड**
**मो.नं.९४२२७४१०९१**

## लोकांच्या स्वप्नातील घरांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवणाऱ्या कष्टकरी हातांचे स्वप्न अजित पवार यांच्या माध्यमातून पूर्ण करणार- शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटनेच्या माध्यमातून जय हिंद कॅम्पस मिलत नगर बीड येथे पंधरा दिवसीय कामगार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते सदरील प्रशिक्षणाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी मोठ्या संख्येने बांधकाम कामगार उपस्थित होते यावेळी त्यांना प्रत्यक्ष साइटवर तसे काम करावे सुरक्षा उपकरणे ही हाताळावी व इतर महत्व पूर्ण मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले यावेळी बोलताना शेख निजाम यांनी आपल्या मनोगतामध्ये म्हटले की बांधकाम कामगार हा जनतेच्या स्वप्नातील घरे आपल्या घामाच्या माध्यमातून व कष्टाच्या माध्यमातून घडवतो व लोकांचे जीवनामध्ये आनंद पसरवतो परंतु बांधकाम कामगार व इतर कामगार यांना व त्यांच्या कुटुंबीयांना हवा तसा मोबदला मिळत नाही व ते सामाजिक प्रवाह मध्ये शिक्षण आरोग्य व सुरक्षा याबाबत नेहमी मागासले असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येत आहे यामुळे महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगार व इतर कामगार यांच्यासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केलेल्या असून त्यामध्ये प्रामुख्याने कामगार विमा योजना, सुरक्षा संच पेटी, मातृत्व योजना, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना यासारख्या अनेक योजना शासन राबवत असून त्याचा फायदा नोंदणी करत कामगारांनी अवश्य घ्यावा व लोकांच्या स्वप्नातील घरे प्रत्यक्षात घडवणाऱ्या कष्टकऱ्यांचे स्वप्न मा. ना. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब आमदार विजयसिंह पंडित साहेब यांच्या माध्यमातून पूर्ण करणार व कोणत्याही अडीअडचणीच्या वेळी पूर्णपणे खंबीरपणे उभा राहील याची ग्वाही दिली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश प्रवक्ते लोकपत्रकार भागवत तावरे यांनी आपल्या मनोगत मध्ये महाराष्ट्र शासन व विशेषता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व माननीय नामदार उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे महिला सबलीकरणासाठी कामगारांच्या उन्नती करिता काम करीत असून शासनाच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या अनेक योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य कष्टकरी कामगार घटकापर्यंत लाभ पोहोचवण्याचे काम व पुण्य अजित दादा पवार करीत असल्याचे सांगितले



## गणेश उत्सव सांस्कृतीक वारसा जपत मोठ्या उत्साहात साजरा

केज । प्रतिनिधी

केज शहरातील शिक्षक कॉलनी, बीड रोड केज येथे राहुल प्रतिष्ठान आयोजित पारंपरिक मानाचा गणेश मंडळाचा गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने एकजुटीने साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील संस्कृतीचे जतन करून कुठलाही धांगडधिंगा न करता व गणेश उत्सवाचे पावित्र्य राखून राहुल प्रतिष्ठान शिक्षक कॉलनी केज ने एक आदर्श निर्माण केला आहे.

दहा दिवस चालणारा उत्सव पहिल्या दिवशी प्राणप्रतिष्ठापना करून,रोज सकाळी, संध्याकाळी श्री. व सौ. यांच्या हस्ते आरती करण्यात आली. महिला भजनी मंडळ, काकड आरती, व विविध प्रकारचे भजन गाणी महिला भजनी मंडळींनी एकत्र घेऊन या राहुल प्रतिष्ठान शिक्षक कॉलनी केज आयोजित गणेश उत्सवाची परंपरा जपून युवकांना आदर्श घालून दिला.

केज पोलिस ठाण्याचे कृतव्यदक्ष पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवने, गटनेते हारुणभाई इनामदार, माजी सभापती विष्णू भाऊ घुले, नगराध्यक्षा सौ सिताताई बनसोड, नगरसेवक सुग्रीव भाऊ कराड, शिवाजी अप्पा हजारे, शिवाजी घुले, लक्ष्मण जाधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राहुल प्रतिष्ठानच्या गणेश उत्सवात सहभागी होऊन शुभेच्छा दिल्या. मार्गदर्शक दत्ता धस पंत, भगवान केदार, पिटू भैय्या तांदळे, राजेश गवळी, संदीप भुतडा, अरुण बप्पा धस, प्रकाश मुंडे, खय्युम शेख, चंदू चौरे, अमोल धस, ठोंबरे बंधू, राजेभाऊ मुळे, सोनू धस, गोटू भैय्या पाळवदे, सुनील घोळवे, डॉ विजयकुमार धस, रमेश धस ,आदींनी मार्गदर्शन केले.

# मशरूमची 'ही' जात लागवड केल्यास व्हाल करोडपती!

शेतकरी अनेक प्रकारच्या मशरूमची लागवड करतात, ज्याची किंमत प्रति किलो २५० ते ५०० रुपये आहे. याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना भरपूर नफाही मिळत आहे. पण, ज्यांची किंमत हजारो नाही तर लाखो रुपये आहे. या जातीच्या मशरूमची लागवड सुरू करून एखादी व्यक्ती करोडपती सुद्धा बनू शकते. विशेष म्हणजे शेतकरी या मशरूमची लागवड लॅबमध्ये करू शकतात. या मशरूम बद्दल बोलत आहोत त्याचे नाव आहे 'कीडा जडी' मशरूम. या मशरूमचे शास्त्रीय नाव कॉर्डिसेप्स सायनेन्सिस असून हे यारसागुंबा वाया नावाने सुद्धा ओळखले जाते.

'कीडा जडी' मशरूमचे फायदे आणि उपयुक्तता : कीडा जडी मशरूममध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळतात. हा मशरूम कर्करोग, मूत्रपिंडाचे आजार आणि श्वसनाच्या गंभीर आजारांवर देखील उपयुक्त आहे. याच्या सेवनाने शरीराला अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, प्रथिने आणि इतर पोषक तत्त्वे मिळतात. यामुळे तुमचे शरीर निरोगी आणि चमकदार राहते. हा मशरूम एक शक्तिशाली ऊर्जा बूस्टर म्हणून कार्य करते. त्याचा वापर विशेषतः पंचतारांकित हॉटेल्स आणि व्हीआयपी लोक करतात. हा मशरूम केशरसारखा दिसतो. आणि पाण्यात टाकल्यावर पाण्याचा रंग पिवळा होतो. याचा उपयोग ऊर्जा वाढवणारे पेय म्हणून केला जातो. त्यामुळेच बाजारात या मशरूमचा दर दोन लाख रुपये किलो आहे.



कीडा जडी मशरूम महाग का आहे? : हे मशरूम महाग असण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याची मर्यादित उपलब्धता. एका अंदाजानुसार आशिया खंडात या मशरूमचा व्यवसाय अंदाजे २०० कोटी रुपयांचा आहे. हा एक जंगली मशरूम आहे. त्याची कमी उपलब्धता आणि मोठ्या संख्येने ग्राहक यामुळे त्याचा दर खूपच जास्त आहे. हे अनेक रोगांवर जीवनरक्षकासारखे काम करतात. यामुळेच जगभरातील मोठे खेळाडू आणि पैलवान या मशरूमची भाजी आवडीने खातात. काही लोकांचा असा विश्वास आहे की ही भाजी खाल्ल्याने इंग्रजी औषधे आणि रसायनांचा शरीरावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. त्यात असे औषधी गुणधर्म आहेत, जे आपल्याला शक्तिशाली बनवतात.

कीडा जडी मशरूमची लागवड कुठे आणि कशी करातात : वास्तविक, या मशरूमची लागवड फक्त चीन आणि तिबेटच्या थंड भागात केली जाते. ही जगातील सर्वात महागडी भाजी म्हणून ओळखली जाते. मशरूमची ही जात कृमीद्वारे वाढविली जाते, म्हणूनच याला कीडा जडी मशरूम असेही म्हणतात. परंतु लॅबमध्ये योग्य वातावरण निर्मिती करून सुद्धा या मशरूमची लागवड करता येते. या मशरूमच्या लागवडीसाठी १० बाय १० खोलीची आवश्यकता आहे. ही खोली प्रयोगशाळा म्हणून वापरली जाऊ शकते. शेतकऱ्यांना या प्रयोगशाळेची विभागणी करावी लागते. ही प्रक्रिया महागडी असली तरी शेतकऱ्याला त्यात सात ते आठ लाख रुपये गुंतवावे लागू शकतात. कारण त्याच्या लागवडीसाठी खूप आवश्यक उपकरणे लागतात.उत्पन्न : हे मशरूम पीक वर्षातून ४ वेळा काढले जाऊ शकते. १० बाय १० च्या खोलीतून दर तीन महिन्यांनी ५ किलो पीक घेतले जाते. अशा प्रकारे, या मशरूमचे एकूण २० किलो वार्षिक उत्पादन होऊ शकते.

कमाई : या शेतीमध्ये प्रयोगशाळेत ३ महिन्यांत ५ किलोपेक्षा जास्त मशरूम तयार करता येतात. अशा प्रकारे अवघ्या तीन महिन्यांत १० लाख रुपयांची कमाई होते. या मशरूमची वर्षातून ४ वेळा काढणी करता येते. अशा प्रकारे एकूण ४० लाख रुपयांची कमाई होऊ शकते.

# गायींच्या या तीन जाती सांभाळल्यास बक्कळ पैसा

## रोज देऊ शकतात ५० लिटरहून अधिक दूध



सध्या भारतात दुग्ध व्यवसाय झपाट्याने पसरत आहे. दुधाच्या व्यवसायातून लोकांना महिन्याभरात लाखोंचा नफा मिळत आहे. हा व्यवसाय करण्यासाठी तंत्रज्ञान आणि ज्ञान देखील आवश्यक आहे. जर तुम्ही योग्य जनावरांपासून हा व्यवसाय सुरू केलात तरच तुम्हाला नफा कमावता येईल, अन्यथा तुम्हाला त्यात इतका पैसा मिळू शकणार नाही.

गीर गाय : ही भारतातील सर्वात मोठी दूध देणारी गाय आहे. या जातीच्या गायींचे कासे खूप मोठे असतात. ही गाय गुजरातच्या गीर जंगलात आढळते. मात्र, आता भारतभर त्याचे संगोपन केले जात आहे. ही गाय दररोज सरासरी १२ ते २० लिटर दूध देते. मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ही गाय दररोज ५० ते ६० लिटर दूधही देऊ शकते असे दिसून आले आहे. तेव्हा विचार करा, अशा तीन ते चार गायी पाळल्या तर महिन्याभरात फक्त त्यांचे दूध विकून किती नफा कमावता येईल.

लाल सिंधी गाय : त्याच्या नावावरूनच ही लाल सिंधी गाय सिंध प्रांतात आढळते. त्याचबरोबर ही गाय थोडीशी लाल रंगाची असल्याने या गायीला लाल सिंधी गाय म्हणतात. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाबमध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ही गाय दररोज १५ ते २० लिटर दूध देते. मात्र, त्याची योग्य काळजी घेतल्यास ते दररोज ४० ते ५० लिटर दूध देऊ शकते.

साहिवाल गाय : उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हरियाणामध्ये तुम्हाला साहिवाल गाय अधिक आढळेल. या राज्यांतील शेतकऱ्यांमध्ये ही गाय सर्वाधिक लोकप्रिय आहे. ही गाय दररोज सरासरी १० ते १५ लिटर दूध देते, मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ती दररोज ३० ते ४० लिटर दूध देऊ शकते. या गायीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ती कमी जागेतही ठेवता येते आणि तिची जास्त काळजी घेण्याची गरज नसते.

# हरभरा लागवडीसाठी करा 'या' सुधारीत वाणांची निवड

हरभरा पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे आहे. हे पीक प्रामुख्याने रब्बी हंगामात घेतले जाते. सोयाबीनची कापणी केल्यानंतर बरेचसे शेतकरी हरभरा लागवडीसाठी सुधारीत वाणांची निवड पिकाची लागवड करतात. हरभरा पिकासाठी जमिनीची निवड महत्त्वाची आहे. हरभरा पिकासाठी मध्यम ते भारी काळी व निचरा होणारी जमीन असावी. सिंचनाची व्यवस्था असल्यास मध्यम प्रकारच्या जमिनीतही हरभरा पीक चांगल्या प्रकारे येऊ शकते.लागवड कधी करावी? : २० ऑक्टोबरनंतर पावसाचे प्रमाण कमी झालेले असते आणि थंडीला सुरुवात झालेली असते, वातावरणात तापमानही जास्त असते अशात वातावरणात हरभऱ्याची पेरणी केल्यास उगवण चांगल्या प्रकारे होते. असे हवामान हरभरा पिकाच्या लागवडीसाठी योग्य असते. मात्र योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे असते.

विजय : अधिक उत्पादन क्षमता, मररोग प्रतिकारक जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे. तसेच हा वाण अवर्षण प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी जिरायतीसाठी ८५ ते ९० तर बागायतीसाठी १०५ ते ११० दिवस इतका आहे. या वाणापासून क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

विशाल : ११० ते ११५ दिवसात येणारा हरभऱ्याचा वाण असून जिरायतीसाठी १३ क्विं./हे. तर बागायतीसाठी २० क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम आहे. विराट : हा काबुली वाण आहे. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम असून याचे दाणे टपोरे आहेत. या वाणापासून जिरायतीमध्ये ११ क्वि./हे. तर बागायतीमध्ये १९ क्विं./हे. उत्पादन मिळते.

दिग्विजय : हा वाण जिरायतीसाठी ९० ते ९५ तर बागायतीमध्ये १०५ ते ११० दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये १४ क्विं./हे. तर बागायतीमध्ये २३ क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य असून मररोग प्रतिकारक आहे. कृपा : हा १०५ ते ११० दिवसात येणारा वाण आहे. या वाणापासून सरासरी १८ क्विं./हे. उत्पादन मिळते. जास्त टपोरे व पांढऱ्या रंगाचे दाणे असणारा हा वाण आहे. फुले विक्रम : या वाणापासून जिरायतीमध्ये १६ क्वि./हे. तर बागायतीमध्ये २२ क्विं./हे. इतके सरासरी उत्पादन मिळते. या वाणाचा वाढीचा कल उंच असल्यामुळे यांत्रिक पद्धतीने (कंबाईन हार्वेस्टरने) काढणी करण्यास उपयुक्त आहे. या वाणाची उत्पादनक्षमता अधिक असून मर रोग प्रतिकारक आहे. फुले विक्रम हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे.




# सध्याच्या परिस्थितीत द्राक्ष, डाळिंब आणि आंबा फळबागेचे असे करा नियोजन!

राज्यात परतीच्या पावसाला सुरुवात झाल्यासारखी परिस्थिती आहे. दुंसरीकडे फळबागा ह्या वेगवेगळ्या अवस्थेत आहेत. द्राक्ष बाग काडी परिपक्वतेच्या अवस्थेत असून पावसामुळे डाळिंबावर तेल्या व आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. यावेळी कसे नियोजन करावे याबद्दल तज्ज्ञांनी मार्गदर्शन केलेले आहे.

द्राक्ष : द्राक्ष बागा काडी परिपक्वतेच्या शेवटच्या टप्प्यात असतील. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात खरड छाटणी झालेल्या बागेत यावेळी काडी परिपक्व होऊन वेलीचा या शेवटच्या टप्प्यातील विश्रांतीचा कालावधी मानला जातो. या बागेत ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात फळछाटणी होणे अपेक्षित आहे. यासाठी काडी परिपक्वता पूर्ण झालेली असावी. काडी पक्वतेनुसार पुढील उपाययोजना महत्त्वाच्या आहेत.

बागेत पाणी पूर्णपणे बंद करावे. पालाशयुक्त खताचा वापर ठिबकद्वारे १ ते १.२५ किलो / एकर / दिवस याप्रमाणे आणि फवारणीद्वारे ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे करावे. ठिबकद्वारे पंधरा ते वीस मिनिटामध्ये खते द्यावीत. ड्रीपर



कमीत कमी वेळ चालू राहील, असे पाहावे. शेंडा पिंचींग करून घ्यावे, बगलफुटी निघालेल्या असल्यास त्या त्वरित काढून घ्याव्यात. फुटी काडीवर मोकळ्या राहतील, असे नियोजन करावे. असे केल्यास काडीवर पुरेसा सूयाप्रकाश पडून त्यात लीग्नीन तयार होण्यास मदत होईल.

डाळिंब : सध्या रोगट फळांवर सतत पडणाऱ्या पावसाच्या थेंबाद्वारे तेल्या रोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होण्याची दाट शक्यता आहे. तेल्या रोगाचा प्रसार नियंत्रणासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड २० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून जमिनीत बुंध्याजवळ आळवणी व फवारणी सलग तीन दिवस करावी.

आंबा : ढगाळ वातावरण आणि अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे दाट पालवी असलेल्या आंब्याच्या झाडावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. झाडावर फांदेमर रोगाचा प्रसार झाल्यास प्रादुर्भावग्रस्त ठिकाणची साल उभी तडकल्यासारखी दिसते. त्यामध्ये पांढरट बुरशीची वाढ झालेली दिसते. फांदी शेंड्याकडून वाळत जाते. नवीन लागवड केलेल्या बागांमध्ये प्रादुर्भाव मुख्य खोडावर दिसून येतो. नियंत्रणासाठी, फांद्या प्रादुर्भावग्रस्त भागाच्या दोन ते तीन इंच खाली कापून नष्ट कराव्यात. कापलेल्या भागावर बोर्डो पेस्ट लावावी. पावसाची उघडीप असताना १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणात घेऊन खोड व फांद्या व्यवस्थित भिजतील अशा प्रकारे फवारणी करावी. झाडाच्या बुंध्यात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.




## महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नॅलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)



राज्य लोकतंत्र
# अहिल्यानगर/जालना
मंगळवार दि. ९ सप्टेंबर २०२५ ५



# पोलीस प्रशासनाने दिलेला शब्द पाळला

## गायीची कत्तल करून व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी आरोपी पकडले

जालना । प्रतिनिधी

जालन्यात गाईचा कत्तल करून व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी जालना जिल्ह्यासह मराठवाड्यामध्ये वातावरण तापलं होतं तसेच जालना शहरात काही ठिकाणी गणपती विसर्जन करणार नाही असा पण निर्णय घेण्यात आला होता परंतु या प्रकरणी पोलीस प्रशासनाने आश्वासन दिल्यामुळे तात्काळ आरोपी पकडले. सोशल मिडीयावर तीन इसम गोवंश जातोचे प्राणी कापतानाचा व्हिडीओ १ सप्टेंबर रोजी प्रसारीत झाल्यावरून पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे व्हिडीओ मधील तीन इसमांपैकी १) असलम महेमूद कुरेशी रा. मंगळबाजार जालना व दोन अनोळखी इसमांविरुध्द गुरनं ७४५/२०२५ कलम २९९,३(५) बीएनएस सह कलम ५ (क), ९,९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदयाप्रमाणे गून्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून मुख्य आरोपी असलम कुरेशी व त्याचे साथीदार फरार होते.



सदर गुन्हयातील फरार आरोपीतांचा शोध घेण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे सदर बाजार व स्थागूशा जालना येथील वेगवेगळे चार पथके आरोपीच्या अटकेसाठी बाहेर राज्यात हैद्राबाद तसेच खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर, मानवत, पाथरी, परभणी रवाना करण्यात आले होते यावरून पोलीस ठाणे सदर बाजार जालना पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील उर्वरीत दोन आरोपी निष्पन्न केले.

सदर आरोपी हे फरार असल्याने त्यांचा तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे व गोपनिय माहिती नुसार सदर आरोपी यांचे ठिकाणाची माहिती मिळाल्याने सदर बाजार डिबी पथकाने यातील मूख्य आरोपी असलम कुरेशी व सोफीयान शेख समद रा. चमडाबाजार जालना यांना सदर ठिकाणाहून ताब्यात घेतले तसेच यासीन रशीद कुरेशी रा. राजणी ता. घनसावंगी याचे ठिकाणाची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणाहून आरोपीस ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीतां विरुध्द संघटीत गुन्हेगारी तसेच आयटी अॅक्ट अंतर्गत कलम वाढ करून पूढील तपास आम्ही स्वतःकरीत आहोत. सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकूमार बन्सल , मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयूष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी , यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री संदीप भारती, स्थागूशा पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांचे नेतृत्वात सपोनि श्री. उबाळे (स्थागूशा), डी.बो. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोउपनि सचिन सानप, पोउपनि संजय गवई, पोहेको जगन्नाथ जाधव, पोहेको धनाजी का, वळे, पोहेकॉ सुभाष पवार, पोहेकों/शिवहरी डिघोळे, पोहेको बाबा हरणे, पोहेकी नजीर पटेल, स्वागूशा चे पोहेकी लक्ष्मीकांत आडेप, पोहेको सतीश श्रीवास, प्रशांत लोखंडे, पोहेको शारदा गायकवाड, पोकों भगवान मुंजाळ, दूर्गेश गोफणे, अजिम शेख, गणेश तेजनकर, राहूल कटकम, धनंनजय लोढे, धिरज भोसले व चालक मोहन हिवाळे, कल्पेश पाटील, सददाम सय्यद याच्या मदतीने केली.

## साळवे यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी जामखेड बंद

### आरोपींना १२ तासांत अटक करण्याची मागणी



जामखेड

रिपाइं जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना बारा तासात अटक करा व त्यांच्यावर मोक्का अंतगर्त कारवाई करावी, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने करण्यात आली. मागणी पूर्ण न झाल्यास राज्यभरात आंदोलन करण्याचा इशारा पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार यांनी दिला. साळवे यांच्या कुटुंबियांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ ७ रोजी कडकडीत जामखेड बंद पाळण्यात आला. तसेच येथील खर्डा चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नान्नज (ता.जामखेड) येथे २४ ऑगस्ट रोजी साळवे यांच्या कुटुंबावर काही गावगुंडानी शस्त्रांसह प्राणघातक हल्ला केला. यात कुटुंबातील काही सदस्य गंभीर जखमी झाले. त्यासंबंधी पोलिस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न करणे व अॅट्रासिटी अंतर्गत गुन्हा दाखल आहे. २६ ऑगस्टला समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना निवेदन दिले होते. आठ दिवसांत आरोपी अटक करा अन्यथा जामखेड बंद ठेवू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विकीभाऊ सदाफुले यांनी दिला होता. परंतु १४ पैकी ६ आरोपींना अटक केली आहे. अद्याप उर्वरित आरोपींवर अटकेची कारवाई झाली नाही. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते अरुण जाधव, माजी प्रा. सुनिल जावळे, पोपट फुले, पत्रकार बाळासाहेब शिंदे, माजी नगराध्यक्ष निखिल घायतडक, समता ग्रुपचे अध्यक्ष संतोष गव्हाळे, राजन समिंदर, रवी सोनवणे, किशोर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. साळवे कुटुंबियांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ जामखेड बंद पाळण्यात आला.

## अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान; शेतकरी चिंतेत



अंबड । प्रतिनिधी

अंबड आणि घनसावंगी तालुक्यांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून, शेतात पाणी साचल्याने पिके पाण्याखाली गेली आहेत. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

सततच्या पावसामुळे जमीन कोरडी होणे (वाफसा) शक्य झाले नाही, परिणामी अनेक पिके पाण्याखाली गेली आहेत. यामुळे, बऱ्याच भागांतील पिके बाधित झाली आहेत. त्यामुळे शेतकरी प्रचंड चिंतेत आहेत. शेतकऱ्यांनी कृषी आणि महसूल विभागाशी संपर्क साधून मदत मागितली आहे. अंबडचे तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी या परिस्थितीची दखल घेत तलाठ्यांना बाधित क्षेत्राचा पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत. या पंचनाम्याच्या प्रक्रियेत कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांना स्वतःच त्यांच्या पिकांची स्थिती दर्शवणारे जिओ-टॅग केलेले फोटो काढून ठेवावे, असे तोंडी सांगण्यात आले आहे. त्यामुळे, नुकसान भरपाई मिळेल की नाही, याबद्दल शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण आहे. या परिस्थितीत, शेतकऱ्यांनी स्वतः ई-पीक पाहणी अॅपद्वारे त्यांच्या पिकांची नोंद सातबारा उताऱ्यावर करून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच, त्यांनी पिकांच्या नुकसानीचे जिओ-टॅग केलेले फोटो पुरावा म्हणून जपून ठेवावे. जर संबंधित कर्मचाऱ्यांनी पंचनामा केला नाही, तर या फोटोच्या प्रिंटसह लेखी अर्ज स्थानिक तलाठी आणि कृषी विभागाकडे देऊन त्याची पोचपावती (पोच) घेणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल.

याबाबत जालना जिल्हा ग्राहक पंचायत मार्फत दोन्ही तालुक्यात सोमवारी निवेदन देण्यात येणार आहे. अशी माहिती अशासकीय सदस्य ग्राहक सरक्षण परिषद सदस्य डा रमेश तारगे यानीं दिलीअंबड तालुक्यातील सुखापुरी, बेलगाव, लखमापुरी, पिठोरी शिरसगाव, धाकलगाव , दोदडगाव,मठ तांडा रेवलगाव, शहापूर, दाढेगाव, भारसवाडा, भगवान नगर, रुई ,भार्डी, बनटाकळी, दहिगव्हाण खुर्द, बनगाव येथील बऱ्याच शेतकऱ्यांनी ग्राहक पंचायतकडे तक्रार नोंदवली आहे.

## जालन्याचा विकास आमदार अर्जुन खोतकरच करू शकतात-घुगे

जालना । प्रतिनिधी



आमदार अर्जुन खोतकर यांच्या संकल्पनेतून मोतीबाग तलाव परिसरात जलकुंड बांधण्यात आला आहे आमदार अर्जुन खोतकर यांनी जलकुंड नव्हे तर इतरही विकास कामे केली आहे जालना शहरातील डीपी रोड अनेक प्रभागातील सिमेंट रोड महानगर पालिकेला नवीन घंटा गाड्या यासह अनेक विकास कामे आमदार अर्जुन खोतकर यांनी केले आहे तर जालन्याचे विकास कामे आमदार अर्जुन खोतकरच करू शकतात. आमदार अर्जुन खोतकर यांच्या पुढाकाराने अजून विकासाला चालना मिळणार असल्याचे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे व शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी व्यक्त केले आहे आमदार अर्जुन खोतकर यांच्या संकल्पनेतून मोतीबाग तलावात १९ कोटी खर्च करून जलकुंड बांधण्यात आला आहे ही संकल्पना आमदार अर्जुन खोतकर यांना सुचली आहे. महाराष्ट्रात नव्हे तसा जलकुंड जालन्यात आमदार अर्जुन खोतकर यांनी करून दाखवला बोलून नव्हे तर करून दाखवणारे आमदार अर्जुन खोतकरच आहे असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केले.

## दारूबंदीसाठी भर पावसात दीड तास चक्का जाम

### बसेस व भाजीपाल्याची वाहने अडकून पडल्याने मोठी कोंडी

अकोले । प्रतिनिधी

तालुक्यातील आदिवासीबहुल वारंघुशी गाव व परिसरात अवैध दारूबंदी करण्यासाठी रविवारी वाकी व भंडारदरा धर ण ते घोटी-इगतपुरी या राज्यमार्गावर वारंघुशी फाट्यावर आदिवासी महिलांसह अबालवृद्धांनी भर पावसात सकाळी १० वाजेपासून रस्तारोको आंदोलन केले. सुमारे दीड तास चाललेल्या या आंदोलनामुळे या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. तर भंडारदरा धरण व परिसरातून भंटकतीस आलेल्या पर्यटकांची फजिती झाली.



पावसाची रिपरिप व अधूनमधून सरीवर सरी कोसळत असल्याने चारचाकीतून पर्यटकांसोबत आलेल्या लहान मुलांसह महिलांचे खाण्यापिण्याचे हाल झाले. एसटी बसेस व मुंबईस निघालेली भाजीपाल्याची वाहने या आंदोलनात अडकून पडल्याने मोठी कोंडी झाली. वारंघुशी गाव व परिसरातील अवैध दारू बंद करा, दारू विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांना येथून कायमचे हद्दपार करा. ज्या परवानाधारक देशी दारू दुकानातून दारू विक्रेत्यांना अवैध विक्रीस उपलब्ध करुन देण्यात येते, त्यांचे ऑडिट करूच परवाने रद्द करा.

कारवाईत फक्त पंटर केसेस न करता मुख्य विक्रेत्यांसह गावांतील ज्या जागेवर हे अवैध दारु विक्री व्यावसाय होत आहेत, त्या जागा मालकांवर फौजदारी कारवाई करा, या परिसरात अवैध दारूबंदी करण्याबाबत लेखी आश्वासन द्या, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला. यामुळे उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांसह पोलिस निरीक्षकांना आंदोलन घटनास्थळी येण्यावाचून पर्याय उरला नाही.

हे आंदोलन नेहमीचेच आहे, असे गृहीत धरून पोलिस निरीक्षक दीपक सरोदे यांनी ठाण्यातील यंत्रणेस बंदोबस्तासाठी पाठवून दिले, याचा अनुभव आंदोलकांना आला. दारूबंदी आंदोलनाचे उर्वरित पान ४ आंदोलकांसोबत भूमिका स्पष्ट करताना अॅड.वसंतराव मनकर.

## यशस्वी व्यक्तीच्या पाठीशी शिक्षकांच्या आशीर्वादाचे बळ

शेवगाव । प्रतिनिधी

शिक्षकांचा त्याग व समर्पण हा समाज उभारणीचा पाया असतो, कोणत्याही यशस्वी व्यक्तीच्या पाठीशी शिक्षकांच्या आशीर्वादाचे बळ असते, असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी केले. येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात शेवगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित शिक्षक सन्मान कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान -२ मधील जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक विजेत्या जि. प. प्राथमिक शाळा वरूर बुद्रुक तर तालुका स्तरावर प्रथम क्रमांक विजेत्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाडगव्हाण, द्वितीय क्रमांक जि.प. प्रा. शाळा ढोरजळगावशे, तृतीय क्रमांक जि.प. प्रा. शाळा तळणी अशा आहेत.

या बरोबरच केंद्रस्तरीय विजेत्या शाळा तसेच माध्यमिक स्तरावर तालुकास्तरावर प्रथम क्रमांक विजेत्या रेसिडेन्सिअल विद्यालय, शेवगाव, द्वितीय क्रमांक डॉ. बाळासाहेब विखे विद्यालय शेवगाव, तृतीय क्रमांक न्यू इंग्लिश स्कूल, खरडगाव या शाळा असून या शाळांना स्मृतीचिन्हे, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या शाळांना बक्षिसाची रक्कम शाळेच्या बँक खात्यावर या वर्ग करण्यात आली होती. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार व्हीडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मधील तालुकास्तर विजेत्या ४४ शिक्षकांचा स्मृतीचिन्हे, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अमरापूरच्या सरपंच आशा गरड, प्राथमिक शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे, केंद्र प्रमुख रघुनाथ लबडे, विष्णू गायकवाड, सुखदेव डेंगळे, बाडगव्हाणचे कृष्णाजी गरूड, शिवाजी कदम, हनुमंत काजळे, माधव भोसले, लक्ष्मण पोपळघट, बाडगव्हाण शाळेचे मुख्याध्यापक राजू साळवे उपस्थित होते. सूत्रसंचालन मुकूंद अंचवले यांनी, तर आभार विष्णू गायकवाड यांनी मानले. प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी शेवगाव तालुक्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यांचा गौरवपर उल्लेख करून तालुक्याचा गुणवत्तास्तर उंचावण्यासाठी केंद्र प्रमुख व प्रशासकीय यंत्रणा घेत असलेल्या कामाचा आलेख मांडला.

## मानपत्र वाटप कार्यक्रमातून आ. खताळांचा काढता पाय

### संगमनेरच्या रंगार गल्लीतील प्रकार, आमदारांच्या भूमिकेने सर्वच अचंबित

संगमनेर । प्रतिनिधी

संगमनेर शहरातील रंगार गल्ली येथील सोमेश्वर गणेश मंडळाच्या गणेशोत्सवात लोकप्रतिनिधींच्या हस्ते आरती करण्याची अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. मागील ४० वर्षांपासून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते आरती होत असते. यंदाही थोरात यांना निमंत्रण होते. त्यासोबतच आ.अमोल खताळ विशेष निमंत्रण दिले गेले. दोघांसमोर दोन आरतीचे ताट आले. आरतीही झाली. शहरातील काही मंडळांचा दोघांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव होणार होता. हा कार्यक्रम सुरू व्हायच्या वेळी मात्र अचानक आ.खताळ यांनी कार्यक्रमातून काढता पाय घेतल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या. त्यांची ही कृती पाहून उपस्थित सर्वच अचंबित झाले. सोमेश्वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री थोरात व आ. खताळ यांच्यासह माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्री थोरात व माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांना निमंत्रित केले.

संगमनेर शहरात गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीवेळी डीजेला टाळून हा प्रकार घडल्यानंतर माजी मंत्री थोरात म्हणाले की, काही व्यासपीठे अशी असतात जेथे राजकारण करायचं नसतं. एकमेकांचा सन्मान ठेवायचा असतो. गणेशोत्सव सर्वांनी एकत्रित येऊन साजरा करण्याचा उत्सव आहे. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी सर्वांनी एकत्र यावे यासाठी हा उत्सव सुरू केला. ढोल ताशांच्या गजरात विविध नृत्य, तलवारबाजी व इतर पारंपारिक खेळांच्या सादरीकरणात गणरायाला निरोप देण्यात आला. सर्व मंडळांच्या कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी नृत्य करत या उत्साहाचा पुरेपूर आनंद लुटला. प्रवरा नदीमध्ये गणरायाचे विसर्जन करण्यात आले. एकविरा फाउंडेशन, बजरंग दल व इतर सामाजिक संघटनांच्या वतीने निर्माल्य बाजूला करून प्रदूषण टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. आ.अमोल खताळ व आ. सत्यजित तांबे यांनी मिरवणुकीस सहभाग घेऊन नृत्य केले. आमदार तांबे यांनी सपत्नीक ढोल वाजवला. रात्री अकरा वाजेपर्यंत गणेश विसर्जन सुरू होते. मी आमदार झाल्याचे पाहवत नसेल आरतीनंतर काही मंडळांचा मानपत्र देऊन सन्मान होणार होता. पण आ.खताळ यांनी सन्मानपत्र बाजूला सारून नाराजी व्यक्त करत कार्यक्रमातून काढता पाय घेतला. ते म्हणाले की, लोकप्रतिनिधीला आरतीचा मान असताना यात काहींनी राजकारण केले. मी आमदार झाल्याचे काहींना पाहवत नसेल.

## जालन्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानासह मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल सज्ज

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात मोरया हॉस्पीटलच्या रुपाने एक नवी आरोग्य क्रांती घडली असून केंद्रीय आयुष(स्वतंत्र प्रभार)तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते मोरया मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचे थाटात उद्घाटन करण्यात आले. जालना शहरातील डॉ. योगेश शाहुराव राठोड यांच्या मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल व विश्वम्? मेडिकल चे उद्घाटन केल्यानंतर उत्तम आरोग्य सेवा आणि सम‍र्मित भावनेतून या हॉस्पीटलच्या माध्यमातून रुग्णाला योग्य उपचार आणि सेवा मिळेल अशी सदीच्छा व्यक्त केली.

यावेळी माजी राज्यमंत्री, मा.आ. श्री अर्जुनराव खोतकर, मा.माजी आरोग्य मंत्री श्री राजेश टोपे, विधानपरिषद सदस्य मा.श्री. राजेश राठोड, माजी आमदार श्री सुरेश जेथलिया, मा.आ.श्री अरविंदराव चव्हाण, जालना न. प. चे माजी नगराध्यक्ष श्री भास्कर आंबेकर, जालना मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष मा.श्री भास्कर आबा दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री भाऊसाहेब घुगे,श्री बळीराम मापारी लोणार,




श्री नंदकिशोर मापारी, श्री अविनाश चव्हाण, जिल्हा मेडिकल असो चे अध्यक्ष श्री साईनाथ पवार, रजिस्ट्रार श्री मोहन राठोड, शिवसेना नेते श्री पंडीतदादा भुतेकर, श्री प्रवीण पवार श्री नितीन राठोड श्री अंकुश राठोड, श्री ए.जे. बोराडे , श्री उद्धव पवार, श्री प्रेमसिंग राठोड, श्री मोहन आडे, श्री भागवतराव राजे जाधव यांची उपस्थिती होती. तसेच जालना शहरातील व ग्रामीण भागातील बहुतांश डॉक्टर्स यांनी हॉस्पिटल ला भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आरोग्यमंत्री श्री राजेश टोपे यांनी डॉ. योगेश शाहूराव राठोड यांच्या मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटला भेट देत त्यांच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतली. त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून वैद्यकीय सुविधा या हॉस्पिटल मध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या हॉस्पिटलमध्ये जालना वासियांना तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या देखरेख खाली उत्तम वैद्यकीय उपचार मिळतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी हॉस्पिटल चे संचालक डॉ. श्री योगेश शाहुराव राठोड, डॉ. सौ. किरण योगेश राठोड यांनी या हॉस्पीटलच्या माध्यमातून जालनेकरांना अत्याधुनिक सुविधेसह आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे त्यांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. या हॉस्पीटलमध्ये अस्थिरोग विभागाचे डॉ. श्री अमोल साळवे, कान नाक घसा विभागाचे डॉ. श्री अश्विनी तुपे(मावळ), मेडीसिन विभागाचे डॉ. श्री प्रसाद गायकवाड, डॉ. श्री अक्षय चव्हाण, युरोलॉजी विभागाचे डॉ. श्री तुषार अग्रवाल, भुल तज्ञ डॉ. श्री विठ्ठल शेळके, डॉ. श्री रामेश्वर तुपे, बालरोग तज्ञ डॉ. श्री नंदकिशोर पालवे, डॉ. श्री उमेश राठोड, पॅथॉलॉजी विभागाचे डॉ. श्री कैलास सचदेव हे सेवा देणार आहेत. दरम्यान या हॉस्पीटलमध्ये कॅन्सर सर्जन डॉ. श्री अविनाश गायकवाड, न्युरोलॉजिस्ट डॉ. श्री रोशन चव्हाण, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. श्री शालिकराम जाधव यांच्या नियमित व्हिजीट्स उपलब्ध असणार आहेत. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साठी डॉ.ओंकार चव्हाण, जालना येथिल सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ मातृत्व हॉस्पिटल चे संचालक डॉ. सुनिल राठोड, इंजि. शिवम चव्हाण, प्रा. श्री नंदकिशोर राठोड. प्रा. रंगनाथ खेडेकर, दत्तापूरचे सरपंच श्री बंडू राठोड, श्री बबनराव शेळके, श्री संजय राजे जाधव यांनी परिश्रम घेतले.

## महिला उपासीका दहा दिवसीय शिबिर

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील भाग्यनगर गोंदी येथे भारतीय बौद्ध महासभा शाखा अंबड यांच्या मार्गदर्शनात बुद्ध संदेश बुद्ध विहार दिनांक ६ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत दहा दिवसीय महिला धम्म उपासीका शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा जालना (पूर्व) चे अध्यक्ष महेंद्रजी बनकर यांच्या मार्गदर्शनाने अंबड शाखेचे अध्यक्ष आयु. उत्तमराव येडे, सरचिटणीस डॉ.राहुल बागुल संस्कार, उपाध्यक्ष प्रा. रमेश जोगदंड,कोषाध्यक्ष भास्करराव गाडगे,, जिल्हा संस्कार सचिव तथा बौद्धाचार्य भीमराव बनसोडे,जिल्हा महिला अध्यक्ष केंद्रीय शिक्षिका ज्योतीताई खरात, प्रकाश घायतडक इत्यादींच्या मार्गदर्शनात उद्घाटन झाले. सुरुवातीस मान्यवरांचे हस्ते भगवान बुद्ध भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय विचार मांडताना श्री येडे यांनी सांगितले की, स्वतःच स्वतः बरोबर स्पर्धा करून सामर्थ्यवान व यशस्वी व्हावे. महिलांनी भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या विचाराचे पालन करून जुन्या अनिष्ट प्रथा बंद कराव्यात. आपण आपला स्वतःच स्वतःचा मार्ग निवडावा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत वाघमारे यांनी केले. तर आभार जगदीश वाघमारे यांनी मानले. याप्रसंगी बौद्धउपासक व उपासीका बाल बालिका यांची उपस्थिती लक्षणीय होती. आशीर्वाद गाथा आणि धम्मपाल गाथाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्व.नितीन चव्हाण यांच्या कुटुंबीयांना धनंजय मुंडे यांच्याकडून १ लाखांची मदत

## दोन्ही मुलींच्या शिक्षणाची मुंडेंनी स्वीकारली जबाबदारी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथील मराठा समाजातील तरुण नितीन माणिकराव चव्हाण यांनी ३० ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी गळफास घेऊन आत्महत्या केली होती; माजी मंत्री तथा परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज स्वर्गीय नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.**

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने श्री मुंडे यांनी मयत नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांना तातडीची एक लाख रुपयांची मदत केली असून,



स्व नितीन चव्हाण यांना दोन मुली आहेत, त्या दोन्हीही मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी देखील धनंजय मुंडे यांनी स्वीकारली असल्याचे यावेळी कुटुंबियांना सांगितले. दरम्यान मराठा आरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या मराठा सेवकांना राज्य शासनाच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली असून, स्व. नितीन चव्हाण यांच्याही कुटुंबीयांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, बबन लोमटे, आबा पांडे, विलास बापू मोरे, अजित गरड, रणजित लोमटे, प्रवीण जगताप, गुणवंत आगळे, उपसरपंच गणी भाई, नामदेव शिंदे यांसह पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक आदी उपस्थित होते.

# जिल्हा कारागृह अधिक्षकावर कारवाई करा

## जिल्हा कारागृहासमोर वृक्षप्रेमींची निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या महिन्यात हरित महाराष्ट्राच्या धर्तीवर ''हरित बीड अभियान'' पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासनाकडून राबविण्यात आले. एका दिवसात तब्बल ३० लाख वृक्ष लागवड करण्यात आली आणि त्याची नोंद इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली.

परंतु, याच हरित अभियानाला तडा देत गणेश विसर्जनाच्या दिवशी बीड जिल्हा कारागृह आवारातील लिंब, चिंच, कवठ, शेवरी, वड यांसारखी ४०५० वर्षे जुनी असलेली ५० हून अधिक झाडे बुंध्यापासून कापून टाकण्यात आली. त्याहून गंभीर बाब म्हणजे शासकीय मालमत्ता विक्रीची रीतसर प्रक्रिया न करता झाडे खाजगी वाहनाने विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

शासकीय कार्यालयाच्या आवारातच झालेली ही वृक्षतोड हा अत्यंत निंदनीय आणि गंभीर प्रकार असल्याने संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार जिल्हा कारागृह अधीक्षक यांच्यावर



प्रशासकीय तसेच दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.'' झाडे लावा झाडे जगवा'' हरित बीड अभियानाला हरताळ फासणा-या जिल्हा कारागृह अधीक्षकांवर कारवाई झालीच पाहिजे आदी घोषणाबाजी करण्यात आली.

यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कारागृहासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते नगरपरिषद मुख्याधिकारी, वन विभागीय अधिकारी यांच्यामार्फत पालकमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, वनमंत्री गणेश नाईक आणि कारागृह विशेष महानिरीक्षक यांना देण्यात आले. आंदोलन स्थळी पोलिस बंदोबस्त म्हणून एपीआय गजानन क्षीरसागर,पोह.संतोष राऊत, सुनिल राठोड, सुनिता राठोड,मपोह.सुनंदा गुळवे यांची उपस्थिती होती.

निदर्शनावेळी अशोक येडे, जिल्हाध्यक्ष (आप)रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), वृक्षप्रेमी अभिमान खरसाडे, डी .जी.तांदळे (अध्यक्ष म.रा.किसानसभा बीड),नितिन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), सय्यद सादेक बीड शहराध्यक्ष (आप),सुदाम तांदळे, शेख मुबीन ,आदी मान्यवर उपस्थित होते.

# आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्या 'ओएसडी'पदी प्रा.डॉ.हमराज उईकेंची नियुक्ती

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार; नवगण शिक्षण संस्थेमध्ये आहेत कार्यरत



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उदयभान उईके यांची 'ओएसडी'पदी (विशेष कार्य अधिकारी) राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. ते नवगण शिक्षण संस्था संचलित परळी येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख असून त्यांच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे.

प्रा.डॉ.हमराज उईके यांनी नियुक्तीनंतर मंत्री कार्यालयात रुजू होऊन कार्यभार स्वीकारला. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिलेले आहे. 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर नुकतेच बीडमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे निमंत्रक म्हणून त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांची शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यतत्परता लक्षात घेता आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उईके यांच्यावर 'ओएसडी' पदाची जबाबदारी दिली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे विभागाचे कार्य अधिक वेगवान व परिणामकारक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, नियुक्तीबद्दल प्रा.डॉ.हमराज उईके यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



बीड : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मा. विरोधी पक्षनेते मा. आंबादासजी दानवे साहेब यांनी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हा प्रमुख गणेश वरेकर, मा. जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, डॉ. नयनाताई सिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सत्कार करतांना उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकारी, युवा शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी बांधवांनी किसान ॲपवर नोंदणी करावी -शिंदे



**वडवणी । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने सन २०२५ -२०२६ या वर्षासाठी कापसाला ८११० रूपये हमी भाव घोषीत केलेला आहे. भारतीय कपास निगमच्या (सि.सि.आय) वतीने या हंगामात

# अंबाजोगाईत खग्रास चंद्रग्रहणाचा उत्सव साजरा दुर्बीणीतून चंद्र पाहण्यासाठी खगोलप्रेमींची गर्दी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

रविवार दि. ०७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री खग्रास चंद्रग्रहण ही अत्यंत महत्वाची खगोलीय घटना प्रत्यक्ष पाहण्यासाठी शहरातील पूज्य बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यासाठी विद्यार्थी व नागरिकांचा अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने सायंकाळी ६ ते ७.३० या वेळात ग्रहण



विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विज्ञान केंद्राच्या वतीने रात्री १० ते १२.३० या कालावधीत दुर्बीणीतून चंद्र पाहण्याची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे शेकडो विद्यार्थी व पालकांनी दुर्बीणीतून चंद्रग्रहण पाहण्यासाठी प्रचंड प्रतिसाद देत उत्साहाने सहभाग नोंदवला. आकाश निरभ्र राहिल्यामुळे ◀◀ पान २ वर



बीड : शहरातील महाकाल गणेश मंडळाच्या आरतीच्या निमित्ताने विविध पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अजित दादा पवार गटाचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, माजी सभापती भास्करराव जाधव, माजी न.प. उपाध्यक्ष शिवाजीराव जाधव, भाजपाचे शहर उपाध्यक्ष प्रकाश आनेराव, शिवसेनेच्या आहिल्यानगर संपर्कप्रमुख एड. उज्वला भोपळे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संत सेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गौतम नाना बिडवे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्याजिल्हा कार्याध्यक्षा शालिनी परदेशी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी या भागातील प्रतिष्ठित नागरिक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# गावकऱ्यांचे बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर अतिवृष्टीची नोंद करून सरसकट अतिवृष्टीची एकरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी समस्त ग्रामस्थांच्या वतीने दि.८ सप्टेंबर सोमवार पासुन बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलनाला सुरूवात केली आहे.



गंगामसला महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात पर्जन्यमान झाले असून संपुर्ण पिकांचे नुकसान झाले आहे, असे असताना या मंडळाची ◀◀ पान २ वर

# महिला,तरुणींचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## आनंदनगरीमध्ये न जाण्याचे सुज्ञ नागरिकांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये आनंदनगरी नावाचा चोर बाजार भरला आहे.या आनंद नगरी मधुन माहागड्या किमंतीचे मोबाईल,मौल्यवान वस्तुंची चोरी होत आहे तर हे चोर आनंदनगरी वाल्यानेचे पाळले असल्याचे बोलले जात आहे तसेच महिलां भगीणींची सुरक्षा ही ऐरणीवर आली असुन या आनंदनगरीत महिलां भगीणींसह तरुणींनी जाऊ नये असे आव्हाण सुज्ञ नागरीक करीत आहेत.





शहरात गेली दहा दिवसा पासुन लहान मुले, तरुण,तरुणीं,महिलां पुरुषानां खेळण्यासाठी विविध पर्कारची खेळणी आणुन हा खेळ खेळण्यासाठी या चालक,चालकाने आवाची सव्वा दर लावुन सामान्याची आर्थिक लुट सुरु केली आहे.या नगरी मध्ये दररोज हजारो तरुण,तरुणी,महिलां मुले सह सामान्य नागरीकांची तोबा गर्दी होत आहे याच गर्दीचा फायदा घेत ◀◀ पान २ वर

# आष्टी नगरपंचायतच्या पर्यावरणपूरक कृत्रिम पावन कुंडात गणरायाचे विसर्जन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी नगरपंचायत यांच्यावतीने पर्यावरण पूरक कृत्रिम पावन कुंडात यंदा गणेश विसर्जनाचा अनोखा उपक्रम राबविला गेला.याच उपक्रमांतर्गत दि.६ सप्टेंबर अनंत चतुर्थी रोजी आष्टी शहरातील तलवार नदी पात्रात पावन कुंडाची निर्मिती करून अनेक गणेश भक्तांकडून घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन मंगलमय वातावरणात करण्यात आले.



भक्ती आणि पर्यावरणाचं सुंदर नातं जपणारे आष्टीकर असा निसर्ग संरक्षणाचा संदेश देत शहरवासीयांचा उस्फुर्त प्रतिसाद यावेळी पाहायला मिळाला.गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने आपण सर्वजण आष्टीचे पर्यावरण जपत आहोत.आपली आष्टी, आपला स्वाभिमान पर्यावरणरक्षक गणेश भक्तांसाठी एक प्रेरणादायक उपक्रम राबवण्यात आला.आष्टी मधील अनेक गणेश भक्तांनी आपल्या गणरायाचे विसर्जन आष्टी नगरपंचायतच्या पर्यावरणपूरक कृत्रिम तलावामध्ये करून निसर्ग संरक्षणाचा सुंदर आदर्श घालून दिला आहे. हा उपक्रम पार पाडण्यासाठी मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,गटनेते किशोर झरेकर, सभापती सुरेश वारंगुळे,सभापती शरीफ शेख,सभापती इर्शान खान, नगरसेवक ◀◀ पान २ वर

# मंडीचा राजा गणपती मिरवणूकीत दुग्धाभिषेक



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अकरा दिवसाच्या गणेशोत्सवानंतर शनिवार दि ६ सप्टेंबर रोजी अंबाजोगाई शहरात श्री गणेशाचे मोठ्या हर्षोउल्हासाने गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात संपूर्ण अंबाजोगाईकरांनी ढोल ताशांच्या गजरात श्री गणेशाला भावपूर्ण निरोप दिला. यावर्षी डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्य संस्कृतीला प्रोत्साहन देत ढोलताशा, हालगी, लेझीम , टिपऱ्या आदीं खेळ खेळत गणेश विसर्जन मिरवणुक संपन्न झाली. यावर्षी अंबाजोगाई शहरात सत्तर ते ऐंशी गणेश मंडळ स्थापन करण्यात आले होते. या स्थापन झालेल्या गणेशमंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत सर्वांचे प्रमुख आकर्षण ठरले ते व्यंकटेश गणेश मंडळाच्या मंडीचा राजा या गणेश मंडळाचे.

लालबागचा राजाची प्रतिकृती असलेला तसेच वीस फूट उंच असलेला मंडीच्या राजाचे विसर्जन देखील मोठ्या दिमाखात करण्यात आले. या गणपतीला ५१ तोळ्याचे सुवर्ण चरण बसवण्यात आले होते. त्यामुळे या गणपतीला पाहण्यासाठी व त्याचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची सलग अकरा दिवस गर्दी झाली होती. अनंत चतुर्थीच्या आदल्या दिवशी गणेशाच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. महाकाय अशा या श्रीगणेश मूर्तीची अनंत चतुर्थीच्या दिवशी भव्य अशी विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत अंबाजोगाईचा व मंडीचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या या श्री गणेशास जवळपास शंभर लिटर दुधाचा दुग्धभिषेक करण्यात आला.हा आगळावेगळा सोहळा पाहण्यासाठी श्रीगणेश प्रेमींनी अलोट अशी गर्दी केली होती. अंबाजोगाई शहराच्या इतिहासात मिरवणुकी दरम्यान कोणत्याही गणपतीस दुग्धभिषेक करण्याची ही पहिलीच घटना होती. त्यामुळे या घटनेची नोंद अंबाजोगाई च्या इतिहासात नोंदली जाईल अशी चर्चा सर्व गणेशप्रेमीच्या कडून केल्या जात होती. अंबाजोगाई शहरात निघालेल्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीत अनेक मंडळे सहभागी झाली

◀◀ पान २ वर

# डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा

## रवी उबाळे, सुभाष चौरे ,विलास डोळसे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगरातील क्रांतीचौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे.



यावेळी मुख्य विश्वस्त एस एम देशमुख विश्वस्त किरण नाईक विश्वास शरद पाबळे राज्याचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे विभागाचे समन्वयक सुभाष चौरे राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.०९ सप्टेंबर २०२५ । पान ७

# गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान दोन मोबाईल चोरांना अटक; १३ महागडे फोन जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

गणपती विसर्जन मिरवणुकीच्या प्रचंड गर्दीचा फायदा घेत भक्तांच्या खिशातील मोबाईल फोन चोरणाऱ्या दोन इसमांना फरासखाना पोलिसांनी शिताफीने अटक केली. या कारवाईत १३ महागडे मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून एकूण १ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अलीम मुस्ताक शेख (२६, रा. मालेगाव, नाशिक) आणि अत्तर अहमद एजाज अहमद (२५, रा. मालेगाव, नाशिक) अशी आहेत.



७ सप्टेंबर रोजी रात्री २.३० ते ३.३० वाजताच्या सुमारास बेलबाग चौक, लक्ष्मी रोड, बुधवार पेठ परिसरात विसर्जन मिरवणुकीदरम्यान फिर्यादी व त्याच्या दोन मित्रांचे मोबाईल चोरीस गेले. याबाबत फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सापळा रचला.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी पासोड्या विठोबा मंदिराजवळून संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी मोबाईल चोरीची कबुली दिली. दोघांच्या ताब्यातून १३ महागडे मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून त्यांची एकूण किंमत १ लाख ७८ हजार रुपये इतकी आहे. पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक महेबुब गोकाशी करत आहेत. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (पश्चिम) राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त (परि-१) कृषिकेश रावले, सहायक पोलीस आयुक्त (फरासखाना विभाग) अनुजा देशगाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकामध्ये पो.नि. (गुन्हे) उत्तम नागवाडे, अजित जाधव, स.पो.नि. वैभव गायकवाड, अरविंद शिंदे यांच्यासह पोलीस अमंलदार तानाजी नांगरे, नितीन तेलंगे, मनिषा पुकाळे, नितीन जाधव, गजानन सोनुने, महेश पवार, चेतन होळकर आदींचा समावेश होता.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांच्या ४९ तक्रार- वजा सूचना प्राप्त



**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ४९ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहेत.आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने आज सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी नेमून दिलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद भूषविले.

आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ४, ३, ८ , ८ , ४, ६ , ३ आणि १३ अशा एकूण ४९ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

यावेळी नागरिकांनी शहरातील वाहतुकीच्या समस्या, गणेशोत्सव काळातील रस्त्यावरील मंडप हटविणे, गटारांची दुरुस्ती, शहरातील पथदिव्यांची दुरुस्ती, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, स्वच्छतागृह तसेच केंद्राची स्वच्छता आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या सहभागातून प्रशासन अधिक पारदर्शक व जबाबदार होईल, तसेच शहरातील नागरी सुविधांच्या उन्नतीस गती मिळेल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

# महिला पत्रकाराच्या विनयभंगप्रकरणी ढोल-ताशा पथकातील दोघांवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

गणेश विसर्जन मिरवणुकीत महिला पत्रकाराशी गैरवर्तन करून तिच्या सहकाऱ्याला धक्काबुक्की केल्याप्रकरणी एका ढोल-ताशा पथकातील दोन वादकांविरुद्ध फरासखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एका महिला पत्रकाराने फरासखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, या प्रकरणी दोन वादकांवर भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ (१), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी महिला पत्रकार शनिवारी (ता. ६) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास विसर्जन मिरवणुकीचे वार्तांकन करत होती. त्या वेळी पथकातील एका वादकाने लोखंडी ट्रॉली आणली. त्या ट्रॉलीचे चाक पायावरून गेल्यामुळे महिला पत्रकाराने विचारणा केली. तेव्हा वादकाने तिच्याशी वाद घालून धक्काबुक्की करून गैरवर्तन केले. या वेळी महिला पत्रकारासमवेत असलेल्या सहकाऱ्याने वादकाला जाब विचारला. तेव्हा वादक आणि त्याच्या सहकाऱ्याने त्यालाही धक्काबुक्की केली. त्यानंतर महिला पत्रकाराने फरासखाना पोलिस ठाण्यात तक्रार दिली. दरम्यान, पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना सोमवारी (ता. ८) निवेदन देत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत राज्यातून अव्वल, पण आयुष्याची झुंज ठरली अपयशी पुण्याच्या अश्विनी केदारीचा दुर्दैवी अंत, सर्वत्र हळहळ!

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्याच्या खेड तालुक्यातून एक अतिशय धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत मुलींमध्ये राज्यात अव्वल आलेल्या अश्विनी केदारीयांचा दुर्दैवी अंत झाला आहे. अश्विनी केदारी ही २०२३ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत महिला प्रवर्गात राज्यात पहिली आली होती. अशातच मागील अकरा दिवसांपासून तिचा मृत्यूशी लढा सुरू होता. मात्र तिचा हा लढा अपयशी ठरला असून या निधनाच्या बातमीने संपूर्ण खेड तालुक्यात शोककळा पसरली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, २८ ऑगस्ट रोजी अश्विनी केदारीसोबत एक दु:खद प्रसंग घडला होता. सकाळी अभ्यास करत असताना तिने अंघोळीसाठी पाणी तापवायला



ठेवले होते. त्यानुसार पाणी किती गरम झाले आहे, हे पाहण्यासाठी जेव्हा ती बाथरूममध्ये गेली त्याच वेळी हीटरचा मोठा झटका तिला लागला. या शॉकमुळे उकळते पाणी तिच्या अंगावर सांडले आणि या भीषण अपघातात ती तब्बल ८० टक्के भाजली. घडलेला प्रकार लक्ष्यात येताच कुटुंबीयांनी तिला तातडीने पिंपरी-चिंचवड येथील डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करत उपचार सुरु केले. या दरम्यान गेल्या ११ दिवसांपासून ती मृत्यूशी झुंज होती. मात्र त्यात आता अपयश आले असून उपचारादरम्यान तिचे दौर्दैवि निधन झाले आहे. दरम्यान, २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रातून मुलींमधून प्रथम आलेल्या अश्विनी केदारी यांचा अकस्मात मृत्यू झाल्याने सर्वत्र सध्या हळहळ व्यक्त केली जात आहे. बाथरुममध्ये हिटरचा धक्का बसून उकळतं पाणी अंगावर सांडल्यामुळे केदारी जवळपास ८० टक्के भाजल्या होत्या. मात्र अकरा दिवसांची त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. त्या पुण्यातील खेड तालुक्यातील पाळू येथील शेतकरी कुटुंबातील होत्या. अश्विनी केदारींच्या मृत्यूने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पुण्यात संपत्तीच्या वादातून मुलाने केले ८० वर्षांच्या आईवर वार, शनिवार पेठेतील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

कौटुंबिक वादातून मुलाने ८० वर्षीय आईवर चाकूने वार केल्याची धक्कादायक घटना शनिवार पेठेतील मेहुणपुरा परिसरात शनिवारी (दि.६) रात्री घडली. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी ६५ वर्षीय मुलाला आईच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक केली आहे.

अविनाश पांडुरंग साप्ते (वय ६५, रा. मेहुणपुरा, शनिवार पेठ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. तर कुसुम साप्ते (वय ८०) असे गंभीर जखमी झालेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल केले आहे. याबाबत अविनाश साप्ते यांचा भाचा आशिष अशोक समेळ (वय ४५, रा. मेहुणपुरा, शनिवार पेठ) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अविनाश, त्याची आई कुसुम आणि फिर्यादी आशिष हे शनिवार पेठेतील मेहुणपुरा भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. संपत्तीवरून त्यांच्यात वाद सुरू आहे. यापूर्वी त्यांच्यात वाद झाले होते. अविनाश साप्ते शनिवारी (दि.६ सप्टेंबर) रात्री दारू पिऊन घरी आला. त्यांनी आई कुसुम साप्ते यांच्याशी वाद घातला. त्यांचा चेहरा आणि डोक्यावर चाकूने वार केले. मुलाने केलेल्या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. आजीला वाचविण्यासाठी आशिष समेळ यांनी भांडणात मध्यस्थी केली. तेव्हा अविनाश यांनी त्याच्यावर चाकूने वार केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अविनाश साप्ते यांना अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक कारके तपास करत आहेत.

# बिबटे थेट गल्ली, बोळात; हल्ल्यात दोन पाळीव कुत्रे ठार: ओतूर परिसर भीतीच्या सावटाखाली

**ओतूर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील ओतूर आणि परिसरात बिबट्यांची दहशत कायम असून आता बिबटे थेट गल्ली, बोळात घुसून पाळीव कुत्र्यांचा फडशा पाडीत आहेत. आता बिबट्याने थेट ओतूर गावठाणमधील देवगल्लीतील दोन पाळीव कुत्र्यांवर हल्ला करत त्यांना ठार केले आहे.

देवगल्ली येथील वैद्य बोळात प्रशांत लक्ष्मण दांगट राहतात. त्यांच्या घरासमोरच्या बंदिस्त अंगणात त्यांचे दोन पाळीव कुत्रे सोडलेले होते. रविवारी रात्री ११ वाजण्याचे सुमारास बिबट्याने पत्र्याचे कंपाऊंड वरून उडी मारून आत प्रवेश केला. त्यानंतर त्याने तेथील दोन्ही कुत्र्यांवर हल्ला केला. त्यात एक कुत्रा जागीच ठार झाला.दरम्यान, बाहेरील आवाजाने प्रशांत दांगट यांनी घराबाहेरची लाईट लाऊन दरवाजा उघडला. त्यावेळी त्यांना बिबट्याने एक कुत्रा जबड्यात पकडून कंपाऊंडवरून छलांग मारताना पाहिले. बिबट्या एका कुत्र्याला घेऊन पसार झाला होता. याबाबत दांगट यांच्या शेजारील प्रत्यक्षदर्शी विवेक घोलप यांनी सांगितले की, या गल्लीत आतापर्यंत बिबट्याने १० ते १२ वेळा दर्शन दिले आहे. त्याने अनेक भटक्या कुत्र्यांची शिकार



केलेली आहे.घटनास्थळी मिळून आलेल्या बिबट्याच्या पायाचे ठसे पहाता हा बिबट्या पूर्ण वाढ झालेला मजबूत शरीरयष्टी असल्याचे लक्षात येते. या परिसरात अत्यंत दाट लोकवस्ती असूनही बिबट्या गल्लीत प्रवेश करीत असल्याने ही चिंतेची बाब बनली आहे. या घटनेने परिसरातील रहिवाशांमध्ये दहशत पसरली आहे.

हा बिबट्या कदाचित घरात घुसून मानवी हल्ला करण्याची शक्यता असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना होण्यापूर्वीच वनविभागाने या बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी येथील नागरिकांनी मागणी केली आहे. या घटनेची माहिती ओतूर वनपरिक्षेत्र कार्यालयातील वनकर्मचारी सारिका बुट्टे यांना कळविण्यात आली आहे.

# कुरघोडीच्या राजकारणाने विद्यापीठाचे मानांकन घसरले; युवा सेनेने घेतला आक्रमक पवित्रा

**पुणे । प्रतिनिधी**

देशातील नामांकित शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय मानांकनात (एनआयआरएफ) मोठी घसरण झाली आहे. मागील वर्षी ३७व्या स्थानावर असलेले हे विद्यापीठ यंदा थेट ९१व्या स्थानावर पोहोचल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. विद्यापीठाच्या या अधोगतीला प्रशासनातील अंतर्गत कुरघोडीचे राजकारण आणि समन्वयाचा अभाव कारणीभूत असल्याचा थेट आरोप करत युवा सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.



विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला धक्का लागलेल्या या प्रकरणानंतर प्रशासकीय कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी विद्यापीठाच्या या घसरलेल्या कामगिरीसाठी संपूर्ण प्रशासन, व्यवस्थापन परिषद आणि अधिकार मंडळाला जबाबदार धरले आहे. प्रशासनाने प्राध्यापकांची कमतरता हे कारण पुढे करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला असला तरी, कुलगुरू, प्र-कुलगुरू, प्रभारी कुलसचिव आणि संबंधित सदस्य या अपयशाचे समान वाटेकरी असल्याचा दावा यादव यांनी केला.

कुलसचिव पदाच्या नियुक्तीवरून चालणारे राजकारण आणि अधिकार मंडळातील सदस्यांची स्वार्थी भूमिका विद्यापीठाच्या पतनास कारणीभूत ठरली आहे. एकेकाळी देशात १६व्या क्रमांकावर असलेले पुणे विद्यापीठ आज सिंबायोसिससारख्या अभिमत संस्थांच्याही मागे पडले आहे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, असेही यादव म्हणाले.

या गंभीर परिस्थितीची नैतिक जबाबदारी स्वीकारून व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेतील सर्व सदस्यांनी तात्काळ सामूहिक राजीनामे द्यावेत, अशी मागणी युवा सेनेने केली आहे. तसेच, कुलगुरूंनी या अपयशाची जबाबदारी न स्वीकारल्यास युवा सेनेच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी रस्त्यावर उतरतील, असा इशाराही देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे विद्यापीठातील वातावरण आगामी काळात आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# समुपदेशनाने वाचला संसार: ४ वर्षांनंतर पून्हा एकत्र



**पुणे । प्रतिनिधी**

अलिकडच्या काळात पती-पत्नीमध्ये कशावरून वाद होतील सांगू शकत नाही. चिंगुस पती किराणा भरत नाही, या कारणावरून झालेला वाद थेट न्यायालयात पोहोचला. एकामेकांच्या विरोधात तीन वेगवेगळे दावे दाखल झाले. मात्र, यशस्वी समुपदेशानामुळे दोघांचा संसार वाचला आहे. २३ वर्षाचा मुलगा आणि १६ वर्षाच्या मुलाच्या भवितव्यासाठी दोघांनी पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. ४ वर्षानंतर दोघे एकत्र आले. अन् एकमेकांविरोधात केलेले तीन दावे तडजोडीने मागे घेतले.

विश्वास आणि विनया (नावे बदलली आहेत) या दाम्पत्याच्या नात्याची ही गोष्ट. या दोघांचा विवाह २००० मध्ये झाला. विश्वास फर्निचर व्यावसायिक असून, विनया गृहिणी आहे. त्यांचा मुलगा कॉलेजमध्ये शिकतो, तर मुलगी शाळेत जाते. विश्वासची आई या दाम्पत्याच्या घरखर्चाला हातभार लावत होती. तोपर्यंत त्यांचा संसार सुरळीत सुरू होता. मात्र, तिचे निधन झाल्यानंतर दाम्पत्यामध्ये वाद वाढू लागले. पती किराणा भरत नाही, अशी तक्रार पत्नीने केली.

त्यावरून दोघांमध्ये जोरदार भांडणे झाली. रागाच्या भरात पतीने थेट विभक्त राहण्यासाठी न्यायालयात धाव घेतली; तर पत्नीने तात्पुरत्या पोटगीसाठी कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला. कौटुंबिक न्यायालयाने पत्नीचा अर्ज मंजूर करत तिला व मुलीला दरमहा सात हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश पतीला दिला. मात्र, पतीने तीन वर्षे पोटगीच दिली नाही. त्यामुळे दोन लाख अठरा हजार रुपयांची थकीत पोटगी मिळावी, यासाठी पत्नीच्या वकिलांनी न्यायालयात दाद मागितली. त्यामुळे दोघे विभक्ती, पोटगी आणि थकित पोटगी असे तीन दावे न्यायालयात लढत होते.


कौटुंबिक न्यायालयाने हे प्रकरण समुपदेशनासाठी पाठवविले. पत्नीतर्फे ॲड. भाग्यश्री गुजर-मुळे आणि पतीतर्फे ॲड. प्रियांका जहागीरदार यांनी काम पाहिले. त्यांच्यासमवेत समुपदेशक शानूर शेख यांनी पती-पत्नीचे समुपदेशन केले. त्यांनी या दाम्पत्याची समजूत घालत त्यांच्यामधील कटुता कमी केली; तसेच मुलांच्या भवितव्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

त्याला सकारात्मक प्रतिसाद देत दोघांनी तडजोड करायचे ठरविले. त्यानुसार, पतीने पत्नीला घरखर्चासाठी दरमहा सात हजार रुपये, वर्षभरात थकित पोटगीचे दोन लाख रुपये आणि तिचे गहाण ठेवलेले बारा तोळे सोने देण्याची तयारी दर्शवली आणि मुलीचे संपूर्ण शिक्षण आणि लग्नाच्या खर्चाची जबाबदारी घेतली; तर पत्नीने पतीविरोधातील सर्व दावे मागे घेण्यास संमती दिली.

# ‘आय लव्ह यू पप्पा’ आयुषच्या अंत्यसंस्कारावेळी बापाच्या हातात मुलाचं भेटकार्ड, टोळीयुद्धात निरागस जीवाचा बळी, अनेकजण हळहळले

**पुणे । प्रतिनिधी**

नानापेठेतील आंदेकर-कोमकर कुटुंबातील टोळीयुद्धाने एका निरागस तरुणाचा बळी घेतला आहे. १८ वर्षीय आयुष उर्फ गोविंद कोमकर याच्या हत्येनंतर ८ सप्टेंबर रोजी वैकुंठ स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार पार पडले. या वेळी पॅरोलवर सुटका झालेले आयुषचे वडील गणेश कोमकर उपस्थित होते. अंत्यसंस्कारावेळी गणेशच्या हातातील आयुषने पाठवलेले ‘आय लव्ह यू पप्पा’ लिहिलेले भेटकार्ड पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. या घटनेने पुण्यातील टोळीयुद्ध आणि कौटुंबिक वैराच्या भयावह परिणामांवर पुन्हा प्रकाश पडला.





आयुषचा मृतदेह तीन दिवस ससून रुग्णालयात ठेवण्यात आला होता. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नानापेठेत ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:४५ वाजता लक्ष्मी कॉ-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या पार्किंगमध्ये आयुषवर दोन हल्लेखोरांनी ११ गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात आयुषचा जागीच मृत्यू झाला. अंत्यसंस्कारासाठी गणेश कोमकरला नागपूर कारागृहातून पॅरोलवर सोडण्यात आले. वैकुंठ स्मशानभूमीत कडक पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार पार पडले.

अंत्यसंस्कारावेळी गणेशच्या हातातील भेटकार्डाने सर्वांचे लक्ष वेधले. हे भेटकार्ड आयुषने आपल्या वडिलांसाठी कारागृहात पाठवले होते. कार्डावर ‘आय लव्ह यू पप्पा’ आणि ‘नवीन ड्रेस पाठवला आहे’ असे लिहिले होते, आणि त्यात आयुषच्या बालपणीचे त्याच्या वडिलांसोबतचे फोटो चिकटवले होते. माझी काही चूक नव्हती, माझ्या मुलाला निरपराध का मारलं? असे गणेश ढसाढसा रडत पोलिसांना विचारत होता. या भेटकार्डाने उपस्थित नातेवाईक, मित्र आणि गावकऱ्यांना हळहळ व्यक्त केली.

आयुष हा गणेश कोमकर आणि त्याची पत्नी संजीवनी कोमकर यांचा मुलगा आणि माजी राष्ट्रवादी काँग्रेस नगरसेवक वनराज आंदेकर यांचा भाचा होता. वनराज आंदेकर यांची १ सप्टेंबर २०२४ रोजी नानापेठेत गोळ्या झाडून आणि धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात संजीवनी, गणेश, त्यांचा भाऊ जयंत कोमकर आणि इतर १७ जणांना अटक झाली होती. पोलिसांच्या मते, वनराज यांच्या हत्येमागे आंदेकर आणि कोमकर कुटुंबातील संपत्तीचा वाद आणि सूर्यकांत उर्फ बंडू आंदेकर यांच्याशी असलेली टोळीयुद्धाची पार्श्वभूमी होती.

पोलिसांनी आयुषच्या हत्येला वनराजच्या हत्येचा बदला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. या प्रकरणात यश पाटील आणि अमित पाटोळे या दोन हल्लेखोरांना अटक करण्यात आली आहे, तर बंडू आंदेकर, त्याचा मुलगा कृष्णा आंदेकर आणि इतर ११ जणांवर गुन्हा दाखल आहे. बंडू आणि त्याचे साथीदार सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांच्या सहा पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**टोळीयुद्धात निरागस जीवाचा बळी**

आंदेकर आणि कोमकर कुटुंबातील वैराने आता भयावह रूप धारण केले आहे. वनराजच्या हत्येनंतर संजीवनी आणि गणेश कोमकर यांना अटक झाली, आणि आता त्यांचा मुलगा आयुष याच्यावर बंडू आंदेकरच्या टोळीने हल्ला केला. पोलिसांच्या मते, आयुषचा या टोळीयुद्धात काहीही सहभाग नव्हता. तो एक सामान्य विद्यार्थी होता आणि सिव्हिल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत होता. तरीही, कौटुंबिक वैर आणि टोळीयुद्धाचा बळी म्हणून त्याला जीव गमवावा लागला.